# बृहन्महाराष्ट्र वृत्त

वर्ष ४५
अंक १२

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

डिसेंबर २०२५
मार्गशीर्ष/पौष
शके १९४७


नमस्कार मंडळी:

दिवाळी साजरी झाल्यावर वेध लागतात ते Thanksgiving चे. नुकताच सर्वांनी Thanksgiving हा सण साजरा केला. एकमेकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण. आपल्या जीवनात दररोज अनेक मंडळी येत असतात. त्यातील बरेच जण आपल्या खांद्याला खांदा देऊन काम करणारे असतात. भले ते आपल्या घरातील कुटुंबीय असोत, किंवा व्यवसायात / नोकरीत वा सामाजिक कार्यात काम करणारे असोत, आपल्याला जे यश मिळते ते या सर्वांच्या मदतीनेच मिळते. काही जणांचा यात खारीचा वाटा असतो, तर काही जणांचा सिंहाचा वाटा असतो. आपण या सर्व व्यक्तींना वेळोवेळी धन्यवाद दिले पाहिजेत, त्याचप्रमाणे त्याही व्यक्तींना जमेल तशी मदत केली पाहिजे.

मला पण अशा अनेक व्यक्तींना धन्यवाद द्यायचे आहेत - माझे कुटुंबीय, माझे बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारणी मधील, तसेच विश्वस्त समितीतील सदस्य, आणि असंख्य स्वयंसेवक - मी या सर्वांचा ऋणी आहे. तुमच्या सहकार्य आणि पाठिंबामुळेच आम्ही एकत्रितपणे यशस्वीरित्या काम करीत आहोत.

नुकताच भारतीय महिला क्रिकेट संघाने एक दिवसीय क्रिकेट विश्वचषक जिंकला. सर्व खेळाडूंचे, तसेच त्यांची व्यवस्थापक समिती, आणि सर्व भारतीयांचे मनःपूर्वक अभिनंदन! भारतातील युवा मुलींसाठी हा फारच महत्त्वाचा क्षण होता. या विजयामुळे भारतातील अनेक मुलींमध्ये खेळण्याची स्फूर्ती निर्माण होईल.

गेल्या महिन्यात समाजरंग, उत्तररंग, आणि मेडिटेशन गटातर्फे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर प्रकाश बाबा आमटे आणि त्यांच्या पत्नी, डॉक्टर मंदाकिनी आमटे, यांचा संवाद आयोजित केला होता. त्यात त्यांनी "मनुष्यसेवा हीच ईश्वरसेवा हे मानून आपण समाजाचे देणे कसे फेडू शकतो" याविषयी मार्गदर्शन केले.

सामाजिक कार्य आणि सामाजिक बांधिलकी बद्दल बोलायचे झाले तर नुकतेच आम्ही मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी निधी संकलन जाहीर केले होते. त्याला बऱ्याच मंडळाकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. आम्ही $२५,००० चे उद्दिष्ट ठरवले होते आणि आनंदाची गोष्ट म्हणजे आम्ही $३०,००० पेक्षा अधिक रक्कम जमवली. मी या सर्व देणगीदारांचे आभार मानतो. ही रक्कम आता आम्ही पूरग्रस्तांना मदत करणाऱ्या संस्थांना देणार आहोत- यात ज्ञानप्रबोधिनी फाउंडेशन, सेवा इंटरनॅशनल, सेव्ह द फार्मर्स, आणि महाराष्ट्र फाउंडेशन या संस्थांचा समावेश आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे आम्ही "मुख्यमंत्री सहायता निधीला" एक लाख रुपयांची देणगी मागेच जाहीर केली होती.

भारतीय कार्यक्रमाबद्दल बोलायचे झाले तर ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी आम्ही प्रशांत दामले यांच्या "शिकायला गेलो एक" ह्या नाटकाचा दौरा यशस्वीरित्या पूर्ण केला. या दौऱ्यात नाटकाचे १६ प्रयोग करून बृहन्महाराष्ट्र मंडळाने एक नवा विक्रम प्रस्थापित केला. या दौऱ्याची संपूर्ण जबाबदारी आमच्या समितीतील पुरू ठाकरे यांनी घेतली होती आणि त्यांना आमच्या समितीने तसेच अनेक स्वयंसेवकांनी मदत केली. त्या सर्वांचे मी आभार मानतो. पुरु यांनी गेल्या महिन्यात ऑस्टिनला भेट दिली तेव्हा परत एकदा प्रत्यक्ष भेटण्याचा योग्य आला.



गेले काही दिवस "अभंग तुकाराम" हा मराठी चित्रपट बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे दाखवण्यात येत आहे. आमच्या समितीतील राहुल देशमुख यांनी या चित्रपटाच्या वितरणात पुढाकार घेतला आहे. अत्यंत स्वस्त दरात या चित्रपटाचे वितरण आम्ही करीत आहोत, ज्यायोगे आपल्या मराठी शाळेतील मुलांना या चित्रपटाचा आनंद लुटता येईल. तरी सर्व शाळा मुख्याध्यापकांनी तसेच मंडळ अध्यक्षांनी आम्हाला सहकार्य करावे अशी मी विनंती करतो. आतापर्यंत ३२ मंडळांकडून या चित्रपटाची नोंदणी झाली आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे हा अजून एक नवा विक्रम झाला आहे. राहुल यांना सहकार्य करणाऱ्या सर्व शाळा मुख्याध्यापक, शिक्षक, व मंडळ अध्यक्षांचे मी आभार मानतो.

सिॲटल् अधिवेशनाच्या नियोजनात गेले काही दिवस अनेक अडथळे आले होते. तेथील कन्वेंशन सेंटरच्या कामगार संघटनेच्या अतिकडक नियमांमुळे जेवणाची किंमत खूपच जास्त झाली होती. ती मंडळी कोणताही नियम शिथिल करायला तयार नव्हती. शेवटी अनेक वाटाघाटीं नंतर आमच्या प्रयत्नांना यश आले आहे. जेवणाची किंमत आवाक्यात आल्यामुळे अधिवेशनाचा मार्ग आता सुकर झाला आहे. याप्रसंगी आम्हाला मदतीचा हात देणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळ विश्वस्त मंडळींचे, तसेच आमच्या समिती मधील आणि सिॲटल् मंडळाच्या संमेलन समिती मधील सर्वांचे, तसेच तेथील इतर सर्व समिती सदस्यांचे मी आभार मानतो. या महिन्यात आम्ही पहिल्या फेरीत निवड झालेले कार्यक्रम, तसेच संमेलनाची तिकीट विक्री जाहीर करू.

डिसेंबर महिना म्हणजे परीक्षा आणि सुट्टीचा महिना. सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा. सुट्टीमध्ये देश-विदेश पर्यटन करणाऱ्या सर्वांना सुखरूप प्रवासासाठी शुभेच्छा. सर्व दत्त भक्तांना येणाऱ्या दत्त जयंतीच्या, तसेच सर्वांना नाताळाच्या हार्दिक शुभेच्छा!

पुन्हा भेटूया नवीन वर्षात - २०२६ साली.

जय हिंद - जय महाराष्ट्र! आपला,

**- प्रसाद पानवळकर** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर


अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
**BMM Treasurer - Santosh Salvi**
**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**
**Ph: 603 438 9279**
**Email: santosh.salvi@bmmonline.org**


**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75
**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**
**मताधिकार असलेले सदस्य**
अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी
**नियुक्त सदस्य**
माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो
**विश्वस्त समिती**
अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका



**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


## या अंकात


| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल | ३ |
| शाळेतील दिवाळी | ४ |
| याचसाठी केला होता अट्टाहास | ८ |
| रेशीमगाठी | ८ |
| झेंडू- एक संवेदना | ९ |
| Club ५५ चा २० वा वाढदिवस | १० |
| जाहिरात | १२ |
| दिवाळी पहाट | १३ |
| कविता: दिवाळी | १४ |
| शिकायला गेलो एक | १४ |
| अवघा रंगचि एक झाला | १५ |
| एका नाटकाची गोष्ट | १६ |
| गमावलेली संधी | १८ |
| व्यंगचित्र | १९ |
| हवीहवीशी हवाई | २० |
| दंत कथा | २१ |
| नकळत घडलेली परंपरा | २२ |
| अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख | २४ |
| स्वामी तिन्ही जगाचा | २४ |
| ओ'हेर एका वैमानिकाची वीरगाथा | २५ |
| हेचि दान देगा देवा | २७ |
| मराठवाडा मदत निधी अहवाल | २९ |
| फिलाडेल्फिया मराठी मंडळ | ३० |
| कॅरम स्पर्धा | ३३ |
| जाहिरात | ३४ |
| MANA Paintings | ३५ |


## संपादक समिती


अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर


हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Email - Vrutta@Bmmonline.org
आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

## २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल

'बीएमएम वृत्त'च्या सर्व वाचकांना नमस्कार. गणेशोत्सव, नवरात्री, दिवाळी सणांची धामधूम मागे टाकत आपण आता वर्षाच्या अखेरीस पोहोचलो आहोत. आशा आहे की आपण सर्वांनी आपल्या कुटुंबियांसोबत दिवाळीचे आणि Thanksgiving सुट्टीचे दिवस सुंदररीत्या साजरे केले असतील. २०२५ हे वर्ष संपत येत असताना, आपण सर्वजण येणाऱ्या ख्रिसमस सुट्टीची आतुरतेने वाट पाहत आहोत. या आनंदी वातावरणात, एक उत्सुकता सर्वांच्या मनात घर करून आहे – आणि ती म्हणजे सिॲटल् येथे होणारे BMM2026 स्नेहसंमेलन! 🎉 आपल्या सर्वांच्या सहभागामुळे आणि प्रेमामुळे आमची तयारी अधिकाधिक रंगतदार होईल ह्याची आम्हाला खात्री आहे.



आमच्या मार्केटिंग समितीच्या पुढाकाराने सिॲटल् महाराष्ट्र मंडळाच्या गणेशोत्सवात उत्साही कार्यकर्त्यांनी संमेलनाची माहिती देणारे 'BMM२०२६ची दवंडी' हे धमाल विनोदी पथनाट्य सादर केले. याद्वारे मनोरंजनाच्या माध्यमातून संमेलनाचा प्रचार प्रभावीपणे करण्याचा उद्देश सफल झाला.
BMM२०२६ च्या YouTube चॅनेलवर आपल्याला हे पथनाट्य बघता येईल
www.youtube.com/watch?v=MbPRQiLen7I

आमच्या सर्व देणगीदारांचे खूप खूप आभार! तुम्ही अजून पॅकेजेस विकत घेतली नसतील तर त्वरा करा आणि आपलं पॅकेज खरेदी करा. ह्याबद्दलची सर्व माहिती आमच्या संकेतस्थळावर bmmseattle2026.org/individual-donor-package-tiers आणि समाजमाध्यमांवर (social media) उपलब्ध आहे. अधिक माहिती वा शंका निरसनासाठी ह्या इमेल-पत्त्यावर संपर्क साधावा - donations@bmmseattle2026.org

BMM2026 मधील उद्योग महोत्सव - **EXPO** म्हणजे तुमच्या व्यवसायाला हजारो उपस्थितांपर्यंत पोहोचवण्याची संधी! आकर्षक पॅकेजेससाठी वेबपेजवर जाऊन लगेच नोंदणी करा.

**Expo webpage:** bmmseattle2026.org/expo
काही प्रश्न असल्यास एक्स्पो टीमला ईमेल करा - expo@bmmseattle2026.org

BMM स्नेहसंमेलनासाठी आम्ही विविध स्पर्धांचं आयोजन केले आहे. दिवाळीपूर्वी आणखी चार नवीन स्पर्धांची घोषणा झाली आहे. सर्व स्पर्धांची माहिती आमच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

- **चला मंगळागौर खेळूया! - मंगळागौर खेळ स्पर्धा**
  bmmseattle2026.org/mangalagaur-competition
- **नृत्यझंकार - उपशास्त्रीय (semi-classical) नृत्यस्पर्धा**
  bmmseattle2026.org/semi-classical-dance-competition
- **नाच गं घुमा, नाच रे पोरा! भारतीय लोकनृत्याची (folk dance) स्पर्धा**
  bmmseattle2026.org/folk-dance-competition
- **😃😂नांदा हास्य भरे! - स्टॅन्ड-अप विनोद स्पर्धा**
  bmmseattle2026.org/stand-up-comedy-competition
- **🥁🎶 तालश्रेष्ठ वादनोत्सव – BMM2026 ढोल-ताशा स्पर्धा! 🎶🥁**
  bmmseattle2026.org/dhol-tasha
- **🎭नाट्यसृजन एकांकिका स्पर्धा:**
  bmmseattle2026.org/natyasrujan-ekankikaspardha
- **📝स्मरणिका कथा आणि मुखपृष्ठ चित्रकला स्पर्धा:**
  bmmseattle2026.org/smaranika/smaranika-competitions
- **🎨 'रंग महाराष्ट्राचे' कलास्पंदन स्पर्धा:**
  bmmseattle2026.org/kalaspandan-artgallery

आपण संमेलनाशी संबंधित बातम्या, घडामोडी आणि गमती जमती आमच्या समाजमाध्यमांतून बघू शकता. येणारे नवीन वर्ष

आनंद, उत्साह आणि नवीन संधींनी समृद्ध होवो – ही मंगलकामना! ✨!!! 💐🙏🏼

**संकेतस्थळ:** https://bmmseattle2026.org
**YouTube Channel:**
www.youtube.com/@BMM2026SEATTLE
**फेसबुक पेज:** www.facebook.com/bmm2026seattle
**फेसबुक ग्रुप:**
www.facebook.com/groups/bmm2026seattle
**इंस्टाग्राम:** www.instagram.com/bmm2026seattle
**इमेल-पत्ता:** स्नेहसंमेलनासंबंधीच्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी– info@bmmseattle2026.org
धन्यवाद 🙏🏼

- **अश्विनी क्षीरसागर, (BMM2026 समिती)**

## वाचकांचे विचार

नमस्कार, आपण पाठविलेला बृहन्महाराष्ट्र वृत्त ह्या मराठी मासिकाचा ऑक्टोबर-नोव्हेंबर जोड अंक आत्ताच मिळाला. आपण मराठी भाषासंवर्धनासाठी कार्य करीत आहांत ह्याचे विलक्षण कौतुक वाटते. आपला आम्हांवर असलेला लोभ पुढे ही असाच राहो हीच अपेक्षा.
**अध्यक्ष, मोहन रेडगावकर**
**मुक्त संवाद साहित्यिक समिती, इंदूर**

Namaskar,
I am grateful for the work you are doing to highlight people's contributions and I extend my best wishes to the team.
**Best regards,**
**Vinod Malusare**

**राशिभविष्य : डिसेंबर २०२५**
**"या महिन्यात वक्री गुरु, शुक्र-बुधाची युती व रवी मंगळाची जोडी शुभ योग घडवतील."**
**अजय तनखीवाले**
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## शाळेतली दिवाळी!!

BMM मराठी शाळा

शाळेतली दिवाळी? हे काय.... असं वाटलं ना? कारण दिवाळी असली की शाळेला तर सुट्टी असते. मग शाळेतली दिवाळी कसली?... असा प्रश्न पडणं साहजिक आहे. पण हीच तर खरी गंमत आहे. कारण ही शाळा आहे खास आपली बृहन्महाराष्ट्र मंडळाची मराठी शाळा जी आहे अमेरिकेत आणि साजरा करणारी मुलं आहेत शाळेचे विद्यार्थी.




सातासमुद्रापार राहणारे हे सगळे मराठी लोक एकत्र येऊन इकडे दिवाळी साजरी करतात. इथे लहानाची मोठी होत असलेल्या त्यांच्या मुलांना देखील आपल्या दिवाळीबद्दल माहिती कळावी, त्यांनी ती आनंदाने साजरी करावी म्हणून प्रयत्न करतात. आपल्या Connecticutच्या मराठी शाळेने देखील ह्यात हातभार लावायचा ठरवलं आहे. ज्या प्रकारे मराठी भाषा मुलांपर्यंत पोहोचवली जाते त्याच प्रकारे आपल्या सणांची, परंपरांची माहिती देखील पोहोचावी ह्यासाठी प्रयत्न सुरू असतात.



ह्या वर्षी शाळेत अनोख्या पद्धतीने दिवाळी साजरी केली. त्याची पूर्वतयारी आधी पासून सुरू झाली. सगळ्या शिक्षकांनी मीटिंग घेऊन दिवाळीत काय करायचं हे ठरवलं. त्यानुसार आधीच्या आठवड्यात सगळ्या मुलांना आणि पालकांना तसा निरोप दिला.

दिवाळीच्या निमित्ताने लहानसं प्रदर्शन भरवलं होतं. त्यात मुलांनी स्वतः तयार करून आणलेल्या आकाशकंदील, चित्र,

सजावटीच्या वस्तू होत्या. त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात मराठी भाषेत पत्र लिहिलेली होती. मुलांचा उत्साह आणि हे प्रदर्शन बघून छान वाटलं. सगळी मुलं, सगळे शिक्षक मुद्दामून भारतीय पेहरावात आलेले होते.

ठरलेल्या वेळात शाळेत सगळेजण आले. मुलांनी आणलेल्या वस्तू एका बाजूला टेबलावर ठेवल्या होत्या. साधारण आठच्या सुमारास पालक यायला लागले. सगळ्यांना हे प्रदर्शन खूप आवडलं. दिवाळीत काय करतात, फराळातील पदार्थ हे मुलांना माहिती आहेत आणि तसंच मुलं व्यवस्थित सांगत देखील होती. त्यांच्या वयाला साजेल इतपत माहिती त्यांना नक्कीच होती आणि ती ते मराठीतून सांगत होते ह्याबद्दल कौतुक केलं पाहिजे. शाळेतील प्रदर्शन, तिथे येणं, भाग घेणं ह्या सगळ्यातला उत्साह आणि आनंद निश्चित दिसून येत होता.

विशेष म्हणजे शाळेच्या वेळातच दिवाळी साजरी करायची असल्यामुळे त्या दिवशी अभ्यासही झाला आणि मजाही करता आली. अशा प्रकारे मुलांनी तर शाळेतली दिवाळी साजरी केलीच त्यांच्या बरोबर पालक आणि शिक्षकांनी देखील साजरी केली.

**- कनेटिकट महाराष्ट्र मंडळ मराठी शाळा**

## कोलोराडो मराठी शाळेचा दिवाळी सोहोळा

कोलोराडो मराठी शाळेत यंदा दिवाळीचा उत्सव अगदी उत्साहात आणि गोड वातावरणात साजरा झाला. बाल मंदिर Kindie आणि बाल मंदिर Little Kids वर्गातल्या छोट्या गोंडस मुलांनी एक १० मिनिटांची नाटिका सादर केली. नाटिकेची सुरुवात बाल कलाकारांनी आपआपल्या घरी दिवाळी कशी साजरी होते याचे वर्णन करून केली - फराळ, फटाके, दिवे, आणि कुटुंबासोबतचे खास क्षण. सगळ्यांनी रंगीत पोशाख घालून, खूपच उत्साहात आपापल्या भूमिका साकारल्या आणि सगळ्यांच्या चेहऱ्यावर हसू आणलं.




त्यानंतर मुलांनी दिवाळीच्या मुख्य दिवसांबद्दल सांगितलं - धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा आणि शेवटी




भाऊबीज. प्रत्येक दिवसाचं महत्त्व त्यांनी छोट्या संवादांमधून आणि कृतीतून खूपच गोड पद्धतीने उलगडलं. प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचं यथायोग्य कौतुक केलं. या नाटिकेमुळे मुलांना आपल्या संस्कृतीची ओळख झाली आणि स्टेजवर उभं राहून मराठी बोलायचा आत्मविश्वासही मिळाला. शिक्षक, पालक आणि स्वयंसेवकांनी मिळून हा कार्यक्रम खूप छान घडवून आणला - खरंच, एक संस्मरणीय दिवाळी.

**- कोलोराडो महाराष्ट्र मंडळ मराठी शाळा**

## ह्यूस्टन मराठी शाळा

ह्या वर्षी ह्यूस्टन मराठी शाळेने एक आगळा वेगळा कार्यक्रम आयोजित केला होता. इथे वाढलेल्या मुलांना मैदानी खेळ काही नवीन नाहीत. पण ह्या वर्षी आम्ही मैदानी खेळांना महाराष्ट्रीय/भारतीय रूप दिले. ह्या वर्षी मुले महाराष्ट्रातील मैदानी खेळ, जसे, कबड्डी, खोखो, लंगडी-पाणी, लगोरी, विटी-दांडू असे नवीन खेळ शिकले आणि खूप





मजेत खेळले. मैदानी खेळाच्या सुरुवातीला मुले काही योगासने शिकली, प्राणायाम आणि ध्यान शिकली. त्या दिवसाचे खास वैशिष्ट्य म्हणजे आम्हाला लाभलेले मल्लखांब विशारद पद्मश्री श्री उदय देशपांडे यांचे मार्गदर्शन! त्यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांना मल्लखांब बद्दल माहिती मिळाली आणि मल्लखांब तसेच दोरीचा मल्लखांब करायची संधीही मिळाली. आमच्या मैदानी खेळांची काही क्षणचित्रे इथे देत

आहोत.



\- ह्यूस्टन महाराष्ट्र मंडळ मराठी शाळा

### मराठी शाळा ऑस्ट्रियामध्ये दिवाळी साजरी

मराठी शाळा ऑस्ट्रियाची सुरुवात सप्टेंबर २०२५ पासून झाली असून शाळेचे वर्ग दोन गटांमध्ये विभागले आहेत — किशोर गट (वय ६ ते १० वर्षे) आणि युवा गट (वय १० ते १४ वर्षे). वर्ग महिन्यात तीन वेळा ऑनलाईन आणि एकदा प्रत्यक्ष घेतले जातात. प्रत्यक्ष वर्ग ग्रात्स (Graz) आणि व्हिएन्ना (Vienna) या दोन ठिकाणी घेतले जातात.

दिवाळी हा शाळा सुरू झाल्यानंतरचा पहिला मोठा सण असल्यामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि स्वयंसेवक सर्वजण उत्साहात होते. सर्व विद्यार्थी पारंपरिक भारतीय पोशाखात आले होते. वर्गाची सुरुवात सरस्वती वंदनेने झाली. त्यानंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गोष्टींमधून दिवाळीचे महत्त्व सांगितले.

शाळेच्या सुरुवातीच्या दिवसांत भाषेची गोडी निर्माण व्हावी यासाठी मराठी शाळेचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना १००% मराठीत बोलायला प्रोत्साहन देण्याचे असल्यामुळे, विद्यार्थ्यांना मराठीतून बोलण्यास प्रवृत्त करण्यात आले. त्यांनी आपापल्या घरी दिवाळी कशी साजरी करतात, कंदील, फराळ, रांगोळी यांविषयी उत्साहाने सांगितले. तसेच "भारतामधल्या दिवाळीतील त्यांना काय आठवते" यावरही सर्वांनी आपले अनुभव मांडले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आपल्या लहानपणी भारतात दिवाळी कशी साजरी होत असे हे सांगितले. वर्गाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी दिवाळी निमित्त आकाशकंदील आणि सजावटीचे दिवे तयार केले. छोट्या हातांनी बनवलेली ही सजावट पाहून सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. अशा सुंदर वातावरणात मराठी शाळा ऑस्ट्रियाने आपला पहिला सण आनंदात साजरा केला.

\- ऑस्ट्रिया मराठी शाळा

### संकल्प मराठी शाळा, बॉस्टन

दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि एकत्रतेचा उत्सव. आणि तोच आनंद, तोच उत्साह यंदा आमच्या शाळेतील प्रत्येक मुलाच्या चेहऱ्यावर आम्हाला दिसला. यंदा दिवाळी काहीतरी वेगळ्या पद्धतीने साजरी करायची होती. केवळ नृत्य–गाण्यांपुरती नव्हे, तर या सणाच्या प्रत्येक दिवसामागचं महत्त्व मुलांच्या मनापर्यंत पोहोचावं, हा आमचा हेतू होता. त्यातूनच ही कल्पना सुचली की प्रत्येक शिक्षक आपल्या वर्गासोबत दिवाळीच्या एका दिवसाचं महत्त्व सादर करेल. अगदी दसऱ्यापासून दिवाळीपूर्व साफसफाईपर्यंत आणि वसुबारस ते भाऊबीजपर्यंत प्रत्येक दिवस मुलांनी व शिक्षकांनी आपल्या पद्धतीने सादर करायचा ठरवला.

कार्यक्रमाच्या दिवशी वाचनालयात सगळ्या मुलांनी पारंपरिक पोशाख घातले होते. कुणाच्या हातात दिवा, कुणाकडे फुलं, कुणाकडे किल्ल्याचं चित्र या सगळ्यांमुळे उत्सुकता अधिकच वाढली होती.

आम्ही कार्यक्रमाची सुरुवात एका हस्तकलेच्या उपक्रमाने केली. प्रत्येक मुलाला विविध दिवाळी विषयांवरील छापील कागद देण्यात आले आणि त्यांनी रंग, रंगीत कागदांचे तुकडे आणि कल्पकतेच्या माध्यमातून ती सजवली. छोट्यांच्या हातातून तयार झालेले रंगीत दिवे, फटाके आणि रांगोळ्या पाहून आम्ही सारेच थक्क झालो. अनेक मुलांनी ही सजावट घरी नेऊन दिवाळीच्या सजावटीत वापरण्याचं ठरवलं.

यानंतर आम्ही आमच्या मुख्य उपक्रमांकडे वळलो. ठरल्याप्रमाणे प्रत्येक वर्गाने आपलं सादरीकरण केलं.

दसरा, दिवाळीची साफसफाई, वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज या प्रत्येक दिवसाचं महत्त्व मुलांनी कथा, नाटक, गाणी, गोष्ट आणि वाचन यांच्या माध्यमातून सादर केलं. आम्ही मध्ये मध्ये प्रश्नोत्तरं घेऊन मुलांना किती समजलं, काय शिकले हे जाणून घेतलं.

या सादरीकरणामुळे प्रत्येक मुलाला दिवाळीचं महत्त्व अतिशय सुंदर पद्धतीने समजलं, याचं आम्हाला खूप समाधान वाटलं. कार्यक्रमाच्या शेवटी प्रत्येक मुलाला आणि शिक्षकांना दिवाळी फराळ भेट देण्यात आला, ज्यामुळे सणाचा गोडवा आणखी वाढला. पालकांकडून आलेल्या प्रतिक्रिया मनाला स्पर्शून गेल्या. त्यांच्या डोळ्यांतील अभिमान आणि आनंद आमच्यासाठी सर्वांत मोठं बक्षीस ठरलं.

अशा प्रकारे संस्कृती, आनंद आणि शिक्षण या तिन्हींचा सुंदर समन्वय साधत संकल्प मराठी शाळेने दिवाळीचा प्रकाश प्रत्येकाच्या मनात उजळवला.



\- संकल्प मराठी शाळा, बॉस्टन

## सातासमुद्रापार, तरी मातीशी नाळ:
## अमेरिकेतल्या चिमुकल्यांनी अनुभवली 'हटके' दिवाळी!

यंदाच्या दिवाळीत ‘EBMM मराठी शाळेने’ एक आगळावेगळा प्रयोग केला. अमेरिकेत वाढणाऱ्या आपल्या मुलांना दिवाळी म्हणजे केवळ फराळ आणि नवे कपडे नव्हे, तर ती एक ‘अनुभूती’ आहे हे समजावे, म्हणून ‘Maker’s Faire’ (मेकर्स फेअर) या अभिनव संकल्पनेतून हा उत्सव साजरा केला. आपण भारतात लहानाचे मोठे होताना दिवाळीची जी धमाल आणि लगबग अनुभवली, तोच सांस्कृतिक वारसा आपल्या मुलांकडे सोपवण्याची धडपड यामागे होती. यासाठी आम्ही “ऐकलेलं विसरतं, पाहिलेलं आठवतं, पण केलेलं समजतं” या उक्तीवर भर दिला.

पुस्तकी ज्ञानापेक्षा मुलांनी स्वतःच्या हाताने काहीतरी घडवले, तेही त्यांच्या आवडत्या, ओळखीच्या गोष्टीतून, खेळातून, तरच ते त्यांच्या स्मरणात कायम राहील. या विचारातून फराळ आणि किल्ला या मजेदार गोष्टी करायचं ठरलं. प्रत्येक गोष्ट करताना, ती तशीच का केली याचं कारण समजणं आणि ती कशी बनवली याचे कुतूहल मुलांना वाटणं हा उद्देश होता.

त्यातली एक गोष्ट म्हणजे पणती. ती टेराकोटा मातीची का करावी, त्यात तेल, वात घालून ज्योत कशी उजळवायची, ती वात करताना सहाणेवर कशी वळून घट्ट करायची, ते हातानं केल्यावरच त्या स्पर्शाने तो घट्टपणा कळतो. ती वात वळण्याची मजा मुलांनी अनुभवली.

तसंच मुलांचे आवडते लाडू, चकली आणि चिवडा हे पदार्थ बनवताना, स्पर्शज्ञान देणाऱ्या खेळातून (sensory games) मुलांना शिकवणं सोपं, प्रभावी, आणि सुरक्षित असतं. म्हणून आम्ही ‘प्ले-डो’ आणि ‘स्लाईम’ सारख्या मुलांच्या परिचयाच्या वस्तू वापरून हे आवडते पदार्थ करायला शिकवले आणि मुलांनी बनवण्याचा आनंद लुटला. कृती आणि ‘असे का’ अशी फ्लॅशकार्ड्स बनवली ज्या योगे अनेक सखोल प्रश्न मुलांच्या मनात जागृत करता आले.

महाराष्ट्रातले किल्ले कसे आहेत, त्यांची रचना, वैशिष्ट्यं काय हे मुलांना प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी, इतिहासाचा जिवंत अनुभव देण्यासाठी, आणि मुलांच्या मनातील कल्पनेला भव्य रूप देण्यासाठी एक मोठा, साधारण ९ फूट उंच आणि ६० फूट लांब असे भव्य दिव्य किल्ल्याचे प्रमुख भाग उभे केले. किल्ल्याचं मुख्य प्रवेशद्वार, ज्यावर टोकदार शूल असतात आणि दिंडी दरवाजा असतो, ते भव्य महाद्वार पाहून मुलं थक्क झाली. आत आल्यावर टेहळणीचे बुरुज आणि चोर दरवाजे का करतात याचं रहस्य जसं समजलं त्याबरोबरच एका भुयारातून आत जाऊन दुसऱ्या भुयारातून बाहेर पडण्याची मज्जा वाटली! किल्ल्यात असणाऱ्या मुदपाकखाना, कोनाडे, तुळशी वृंदावन अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण जागा मुलांना समजल्या. या जागा आणि वस्तू समजण्यासाठी I spy या खेळातील तंत्राचा वापर करून, त्यांना काही संकेत (क्लूज) देऊन या वस्तू शोधायला सांगितले होतं. पेटाऱ्यात काय लपलेलं होतं आणि शिवाजी महाराज आग्र्याहून कसे सुटले यांची उत्सुकता मुलांच्या मनात जागी झाली. तसंच या भव्य किल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ढाल तलवार, मशाली, झेंडे, इतकंच नाही तर साक्षात जिजाऊ, युवा शिवाजी राजे आणि मावळे यांना पहाताना मुलांच्या डोळ्यासमोर इतिहासाच्या पुस्तकातील व्यक्तिरेखा जणू मूर्तिमंत उभ्या राहिल्या आणि म्हणूनच हा किल्ला आणि या ऐतिहासिक व्यक्तींना पहाणं हा या दिवाळी कार्यक्रमाचा मानबिंदू ठरला!

आमच्या स्वयंसेवकांनी सर्व साहित्य अगदी सुरुवातीपासून अत्यंत कल्पकतेने स्वतः बनवले होते. चिवड्याचे साहित्य फोम बोर्ड आणि पेपर मॅश (लगदा) पासून बनवले होते. चकली 'प्लेडो' पासून बनवली होती. पणती फोम बोर्ड आणि इलेक्ट्रिक सर्किट वापरून तयार केली होती. लाडू 'प्लेफोम', स्लाईम आणि थर्माकोल बॉल्सपासून बनवले होते. किल्ला हा खोकी, पुठ्ठे, आणि पीव्हीसी (PVC) पाईप्सपासून बनवला होता. आमच्या स्वयंसेवकांनी त्यांनी बनवलेल्या प्रत्येक वस्तूमध्ये त्यांची कला आणि प्रेम ओतले होते. छोट्या गोष्टींकडे लक्ष, सुरक्षितता आणि मुलांच्या विकासाचे टप्पे लक्षात घेऊन, सर्व वस्तू आणि उपक्रम ५ ते १५ वयोगटातील मुलांसाठी नियोजित केले होते. हे उपक्रम वय आणि इयत्तेनुसार सोपे किंवा कठीण करता येण्यासारखे होते. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या लहान गटांमुळे प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष देणे आणि त्यांना सखोल प्रश्न विचारणे शक्य झाले.

अशाप्रकारे संस्कृती, शिक्षण, आणि निखळ धमाल यांची उत्तम सांगड घालण्याच्या उद्देशाने पाहिलेले हे स्वप्न, ७० हून अधिक

स्वयंसेवकांच्या अपार मेहनतीने आणि प्रेमाने सत्यात उतरले आणि हा दिवाळी उत्सव मोठ्या दिमाखात साजरा झाला!

**- EBMM मराठी शाळा**








## याचसाठी केला होता अट्टाहास -- बालभारती परीक्षा

गेल्या २ वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतर आमच्या शिक्षक, पालक आणि बृहन्महाराष्ट्र मंडळातील नेतृत्वाच्या मेहनतीमुळे ही अभिमानाची बातमी सांगताना आनंद होत आहे की महाराष्ट्र शासनाकडून मराठी भाषा परीक्षेची अधिकृत प्रमाणपत्रे प्राप्त झाली आहेत. १८ प्रकारचे नॉर्म्स पाळून ही प्रमाणपत्रे बनवली आहेत.

या प्रवासात आम्हाला विविध सरकारी कार्यालयांना वारंवार भेटी द्याव्या लागल्या, अनेकदा प्रलंबित थांबून अधिकाऱ्यांच्या भेटी घ्याव्या लागल्या, अनेक बैठकांना सामोरे जावे लागले – बालभारती कार्यालयापासून ते मंत्रालयापर्यंत. शेवटी, सर्व छाननीनंतर आणि प्रचंड परिश्रमानंतर आपण हा टप्पा गाठला आहे – या प्रवासात ज्यांनी आपला वेळ खर्च करून कष्टाने आणि निष्ठेने हे काम केले त्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन!

आम्हाला महाराष्ट्र शासनाकडून १०३ प्रमाणपत्रे प्राप्त झाली जी सर्व शाळांकडे पाठवली गेली. हा क्षण आपल्या संपूर्ण समुदायासाठी अभिमानाचा आहे आणि एकत्रितपणे काम करून काय साध्य करता येऊ शकते याचे उत्कृष्ट उदाहरण आहे!

**- राहुल देशमुख, कार्यकारिणी सदस्य,**
बृहन्महाराष्ट्र मंडळ मराठी शाळा

## Reshimgathee

Maharashtra Mandal Bay Area (in association with Maharashtra Mandal Los Angeles, Seattle Maharashtra Mandal and San Diego Maharashtra Mandal) hosted a memorable evening for Reshimgaathee 2025 Singles Meetup, on October 12, 2025 at Sakoon in Fremont, CA. Reshimgathee, which began as an effort to bring young Marathi singles together has now grown into a much-anticipated annual gathering that

beautifully blends culture, conversation, and community.

This year's event welcomed a lively and diverse group of 90+ participants, many of whom traveled long distances to attend. From the hubs of Seattle and Los Angeles to the quieter corners of Idaho, young Marathi professionals made their way to the Bay Area, eager to meet like-minded individuals in a warm and culturally familiar setting.

The evening opened with a relaxed hour, where guests mingled over ice-breaker games designed to spark conversations. The energy only grew as participants rotated through engaging rounds of speed dating, structured to ensure that everyone had an opportunity to meaningfully connect.

A delicious dinner set the stage for deeper conversations, and the buzzing conversations kept the atmosphere light, joyful, and inviting.



What made the night truly special, however, was the spirit of community. Reshimgaathi has always aimed to create a space where Marathi youth can meet without pressure and where friendships, conversations, and connections unfold naturally. This year's meetup captured that spirit perfectly. Many guests left with new friends, renewed confidence, and the hope of finding something more.



MMBA remains committed to expanding this initiative. Plans are already underway to bring more Reshimgaathi events to Marathi communities across the West Coast, continuing the mission of nurturing cultural ties while helping young adults find their life partners!

- **Saee Kalaskar and Ajinkya Mandhare,** Maharashtra Mandal Bay Area, Santa Clara, California

## झेंडू - एक संवेदना

शेकडो पाकळ्यांनी गुंफून
अन! सुंदर मोहक रंगानं
झालो मी अतीव डोलदार रूपानं
लाल केशरी पिवळ्या झग्यानं
जरी सुगंध नसे साऱ्या अंगभर
जन नयना देई मी सुख अपरंपार
सणासुदीला मी असे अग्रेसर
हातात हात घालून हार तयार
सान्निध्यात देवाच्या विसरतो भान
पांडुरंगा किमया तुझी असे मज जाण
सणावाराला असतो आम्ही घरोघर
सहवास तुझा मिळू दे असाच वरचेवर
मांगल्याचे प्रतीक आम्ही बनून
इतर पुष्प वेलींचा ठेवून मान
आम्ही सजवतो प्रसन्न प्रवेश द्वार
बनुनी तोरण सुखावतो खरोखर
दिंडी वारी जंत्री असो वा अंत्ययात्रा
सण दिवाळी पोळा आणि हो दसरा
सुख दुःखात आहे तोच सखा सोबती खरा
मम् समान शबरी सुदाम्यास मानाचा मुजरा
देवभोळ्या ह्या झेंडूची अशी ही चार ओळींची कविता
लीन सदा असो मी असाच तुझ्या हे सृष्टीच्या करवित्या
जय जय रघुवीर समर्थ!!

- **अद्वय कुमार प्रधान,** समरफिल्ड, नॉर्थ कॅरोलायना

## न्यू जर्सीतील 'Club ५५'चा २० वा वाढदिवस - भावना, मैत्री आणि संस्कृतीचा उत्सव

न्यू जर्सीतील Club ५५ चा २० वा वाढदिवस ८ नोव्हेंबरला अत्यंत दिमाखात साजरा झाला. क्लबची अट वय किमान ५५! त्यामुळे कार्यक्रमातील बहुतांश मंडळी सत्तर-पलीकडची, पण उत्साह असा की अगदी टीनएजरलाही लाजवेल. नटून–थटून, घरच्या मंगलकार्याला जावं तसे सगळे आले होते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत चालणारा हा अखंड आनंदोत्सव. कित्येक स्वयंसेवकांनी स्वागत केलं आणि मिठाईचा gift box दिला.

प्रारंभीच्या नाश्त्याला साबुदाणा वडा, पोहे, भजी, चटण्या आणि गरमागरम चहा... या सुंदर सुरुवातीने दिवसाची लयच वेगळी लागली.

शकुन पानसेंनी कार्यक्रमाला अतिशय सुंदर नाव दिलं—"भेटीत पडल्या गाठी, भेटीत तृप्तता मोठी." ही ओळ ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गाठी या गाण्याचा मर्मबिंदू आहे. ती इतकी साधी आहे, आणि तरीही ती सांगते ते खूप खोल आहे. बाळ कोल्हटकरांचे शब्द, हृदयनाथांचं स्वरबद्ध सौंदर्य, आणि कुमार गंधर्वांच्या स्वरातलं आध्यात्मिक गहिरं स्वरूप, सगळं एकत्र येऊन जणू सांगतं की काही नाती विचारांच्या नव्हे, आत्म्यांच्या पातळीवर घडतात.

ही फक्त कविता नव्हे, तर Club ५५ च्या नात्यांचा आत्मा आहे. येथे देणं-घेणं नाही, पण ऋणानुबंधाच्या गाठी मनात खोलवर घट्ट बांधल्या जातात—निर्व्याज, नि:स्वार्थ. अशा नात्यांना नाव नसतं, परिभाषाही नसते, पण भेटींच्या स्मृती मनाच्या त्या कोपऱ्यात जाऊन विसावतात, जिथे शब्द पोहोचत नाहीत, फक्त भावना राहतात.

स्वागतासाठी आलेल्या अलका पै म्हणाल्या की ४५ सदस्यांपासून सुरू झालेला हा प्रवास आता २७० पर्यंत पोहचला आहे. डिनर, करमणुकीचे कार्यक्रम, पिकनिक्स, लेक टूर, सेमिनार्स, वाइनरी ट्रिप्स आणि कळस म्हणजे क्रूझ! या सर्वाचं श्रेय त्यांनी प्रेमाने सदस्यांना दिलं—"तुम्ही आहात म्हणून आम्ही आहोत."

Club ५५ चे सभासद समाजकार्यातही मनापासून सहभागी होतात. क्राफ्ट ग्रुप नं nursing home आणि लहान वयातील कर्करोग रुग्णांसाठी blankets, hats आणि scarves विणले. व्हीलचेअर्समधील महिलांसाठी पिशव्या बनवल्या —दयाळूपणाचे सुंदर उदाहरण. या कार्यकर्त्यांचा गौरव हा कार्यक्रमाचा अविभाज्य भाग ठरला. तेव्हा टाळ्यांच्या गजरात त्यांना एक मानाचा मुजरा करण्यात आला.

तसेच, मंचावर नवीन कार्यकारिणीची - निरंजन देव, नीता देवळाणकर, मकरंद देवधर आणि विद्या देव- ओळख करून देण्यात आली. गेल्या वर्षापासून क्लब ९० वर्षे पूर्ण करणाऱ्या सदस्यांचा सत्कार करतो—ही परंपराही पुढे नेण्यात आली. या वर्षी दोन मान्यवरांचा विशेष सन्मान झाला—

सौ. सुशिला चिटणीस (वहिनी) — सर्वांच्या लाडक्या

पंडित सुजन राणे — व्यवसायाने बँकर, परंतु निवृत्तीनंतर गायन, लेखन आणि चित्रकलेची सुंदर वाट चोखाळणारे

मग त्यांनी राजन गडकरींना त्यांच्या क्लब ५५ बद्दलच्या भावना व्यक्त करायला सांगितलं. ते म्हणाले, "मला एक गाणं आठवतं — "चाफा बोलेना, चाफा चालेना..." कवी बींची ती कविता...

त्यात एक ओळ – 'हे विश्वाचे आंगण, आम्हा दिले आहे आंदण!' ही कविता कानात घुमली. . .कवी बींची ती ओळ किती सोपी, किती हृदयाला भिडणारी.

मला वाटतं, हे Club55चं आंगणही आपल्याला आंदणच आहे. आपल्या घरचं आंगण आहे. जिथे आपण खातो-पितो, नाचतो-गातो, हसतो-खेळतो, कारण हे आपलं आंगण आहे. आपल्या सदस्यांना वेगवेगळ्या गोष्टींमध्ये रस आहे. ज्ञानदेवांचे अभंग, सुलोचनाची लावणी, किशोरीताईंची भैरवी, भीमसेनजींचं यमन-कल्याण. त्यांना तुझं आहे तुजपाशी सारखी नाटकं आवडतात आणि मेंदीच्या पानावर सारखी भावगीतं सुद्धा भावतात. वर्षानुवर्षे क्लबच्या कार्यकर्त्यांनी सर्वांच्या कलाप्रेमाचे लाड पुरवले. पण सारं काही इतकं सुंदर असताना देव कुठंतरी डाग लावतो. गेल्या वर्षी शोभा पडते, जगदीश वासुदेव आणि सुहास पै — ह्या गुणी कार्यकर्त्यांना स्वतःच्या घरी नेलं. पण त्यांच्या आठवणींचा सूर शोधायला गेलं तर मिळतं त्यांचं हसू. तर त्यांच्या स्मृतीला वंदन करायला क्षणभर नतमस्तक होऊया.

वॉशिंग्टनच्या हेमंत अनिखिंडी यांनी दिग्दर्शित केलेलं 'लेखकाचा कुत्रा' हे नाटक रंगमंचावर झालं. चांगला लेखक मालिकांच्या जगात जातो तेव्हा निव्वळ TRP साठी करावी लागणारी तडजोड हया धगधगत्या प्रश्नावर आधारित नाटक प्रेक्षकांना विचार करायला लावतं. लेखक आणि विद्यार्थ्यांनी हा प्रश्न सहज आणि नाट्यमयपणे मांडला.

यानंतर मेजवानीची वेळ आली. Non-veg साठी चिकन, मटण, फिश, veg साठी तडका डाळ, डाळ माखनी, उंधीयू. ज्यांना अजून समाधान हवं असेल त्यांच्यासाठी भरपूर चायनीज पदार्थ.

डेसर्टमध्ये आईस्क्रीम, बदामाचा शिरा, रसमलाई... प्लेट कितीही भरली तरी अजून काही मागे असल्यासारखं वाटत होतं. अशी भरगच्च मेजवानी देणारा म्हणजे - जगदीश वासुदेव. त्याची खूप आठवण आली.

जेवणानंतर स्टँडअप कॉमेडियन कौस्तुभ सोमण रंगमंचावर आला. अमेरिकेतल्या ४० वर्षाच्या दांपत्याचे किस्से त्यांनी इतक्या खुमासदार शैलीत सांगितले की सभागृहात हास्याचे खळखळाट उसळले.

कार्यक्रमातील एक अभिमानाचा क्षण म्हणजे BMM च्या ‘उत्तररंग’ गटाच्या अध्यक्षा मेधा गोडबोले यांनी खास पाठवलेला संदेश. अलका पै यांनी तो मनःपूर्वक वाचून दाखवला. मेधाताईंनी क्लब ५५ च्या कार्यकर्त्यांच्या दूरदृष्टीचे, सामाजिक बांधिलकीचे आणि गेल्या वीस वर्षांत निर्माण झालेल्या ‘कुटुंबभावनेचे’ मनापासून कौतुक केले. न्यू जर्सीतील ज्येष्ठांना मैत्री, आधार आणि आनंद देणारी ही संस्था इतर मराठी संघटनांसाठी प्रेरणादायी आदर्श ठरली आहे, असे त्यांनी नमूद केले. उत्तररंगमधून तयार झालेली आपली मैत्री आणि नात्यांची जपणूक माझ्यासाठी मौल्यवान आहे, आणि गरज पडल्यास क्लब ५५ सदैव माझ्या पाठीशी उभा राहील — हा विश्वास माझ्या मनाला नेहमी आधार देतो, असे त्यांनी प्रेमाने लिहिले.

हा संदेश ऐकताना सभागृहात  आपुलकी, प्रेम आणि  वीस वर्षांची वाटचाल खरंच किती सार्थ आहे, हे सर्वांना पुन्हा जाणवले.

२० वर्षांपूर्वी काही लोकांना एक जाणिव झाली, मराठी वयस्कर लोकांसाठी सुरक्षित, आनंदी, आपुलकीचं वातावरण हवं. मीना देशपांडे, मोना वासुदेव, नंदा पडते, अलका पै, शकुन आणि रामानंद पानसे यांनी Club ५५ ची पायाभरणी केली. कार्यकारिणीत नव्याने आलेल्या सभासदांनी त्यांचा सन्मान खणा-नारळाने ओटी भरून आणि शाल देऊन केला. विशेष उल्लेख नंदा पडते यांचा.

गेल्या २० वर्षांत मराठी विश्वात आणि पुढील २० वर्षं Club ५५ मध्ये त्यांनी केलेली शांत, सलग सेवा खरोखर उल्लेखनीय आहे. स्वभावाने अतिशय शांत—पण त्यांचं सामाजिक कार्य मोठमोठ्याने बोलतं. वयाच्या ८८व्या वर्षीही ते अत्यंत सुसंस्कृत, सुंदर पद्धतीने वृद्धत्व जगतात याचा आदर्श आपण सर्वांसाठी आहे. Club ५५ मध्ये वरिष्ठ single सदस्यांसाठी स्वतंत्र गट सुरू करण्यामागेही त्यांची दूरदृष्टी दिसते.

मराठी मनांच्या प्रत्येक वयोगटातील गरजा समजून घेण्याचा त्यांचा व्यापक दृष्टिकोन आजही तितकाच जागा आहे, आणि ते email द्वारे सर्वांना माहिती पोहोचवत राहतात. कार्यक्रमाची अंतिम आठवण सुहास पै यांना समर्पित होती. हिंदी फिल्म संगीत त्यांना अतिशय प्रिय, आणि त्या चालींवर त्यांनी केलेली मराठी गाणी. हा संगीताचा धागा पकडत नीलम दळवी यांनी नृत्याचा अप्रतिम कार्यक्रम सादर केला. सर्व नर्तक ज्येष्ठ नागरिक होते, पण त्यांची ऊर्जा, मूव्ह्ज, कोऑर्डिनेशन अविश्वसनीय. ‘अपलं चपलं’, ‘दिल मेरा धडके’, ‘हवा के साथ’ — प्रत्येक गाण्यावर सभागृह तरुणपणात परत गेलं. एका नाचात नरेंद्र नेरुरकरने सुहास पै ची hat घालून सुहास पै ची आठवण करून दिली.

शोचा शिखरबिंदू सैराटचं ‘झालंय झिंग झिंग झिंगाट’! गाणं सुरू होताच स्टेजवरील नर्तकांसोबत संपूर्ण प्रेक्षागृह नाचायला लागलं. असा उत्स्फूर्त प्रतिसाद क्वचितच पाहायला मिळतो. नाचत-नाचत सगळे इतके रमले की मधली वीस वर्षं गेलीच नाहीत असं वाटलं — जणू आपण अजूनही तेव्हाचेच ‘५५’ वयाचेच आहोत. कार्यक्रम संपला, वेळ झाली, पण कुणालाच उठावसं वाटत नव्हतं. इतका अपूर्व, हृदयाला भिडणारा, सर्वांना एकत्र आणणारा हा आनंदसोहळा होता. कार्यक्रम संपला तेव्हा कार्यकारिणीच्या चेहऱ्यावर अभिमानाच आणि आनंदाचं हसू दिसत होतं.



Makrand Deodhar, Alaka Pai, Nanda Padte, Shakun Panse, Vidya Deo, Neeta Deolankar, Niranjan Deo

**-राजन गडकरी**
माहवा, न्यू जर्सी

### वाचकांचे विचार

नमस्ते वृत्त टीम,

आताच ईमेल पाहिली, आणि त्यात तेजश्रीचे चित्र तुम्ही सामावून घेतले त्याबद्दल तुम्हा सर्वांचे मन:पूर्वक धन्यवाद!!

नेहमीच मी दर महिन्याच्या वृत्त ची वाट बघत असते. मराठी  वाचनाचे एकमेव साधन आहे हे!!  थँक यू पुन्हा एकदा!

**-प्रिया कुलकर्णी-मोघे**




A RARE HIDDEN GEM
FOR NRI FAMILIES IN USA

in

KARVENAGAR, PUNE

Your Premium Home Awaits You

LIMITED OFFER

BE AT HOME




Pristine, Low-Density Neighborhood / Bungalow-like Spacious Flats / All East-Facing Units /Architectural Flexibility / Ample Covered Automatic Parking / Extensive Solar Power / Rooftop Amenities With Gazebo and More / Fresh Air / Green Surrounding / Meditation and Yoga Space / High Grade Specifications / GEM5 Green Building Certified / Excellent Connectivity to 4 Major Arteries / Close to Shops, Malls and Colleges / Easy Access to Colleges, Hospitals, Restaurants, Temples and Parks / Culturally Rich and Socially Harmonious Neighborhood / Ease of Formalities with Transparency / Attractive Pricing for NRI / Great Savings / Excellent Domestic Services / Life of Peace, Joy and Harmony

UNIQUE OPPORTUNITY

PERFECT LOCATION

FLAWLESS EXECUTION

VALUE GROWTH



**Beautiful 4BHK, Full-floor Unit, All 4 Sides Open, Fresh Air, Panoramic Views, Owner's Lift**







OPEN ARCHITECTURE
PREMIUM SPECIFICATIONS
GREEN SURROUNDING
BEAUTIFUL VIEWS












3BHK Unit, 3 Sides Open, Spacious Unit, Flexible Layout, Large Living Room & Kitchen, Only 3 Units Available, Adjacent Units Available For Relatives & Friends, Superior Quality and High-Grade Specifications

Contact: Sanskruti Vastuyog
OWNER-BUILDER in USA
WhatsApp +16102201028
Email: jay.warunkar@gmail.com

https://sanskrutivastuyog.com/

Share with friends, family & other groups

Commitment to Excellence & Harmony

## दिवाळी पहाट

एक परदेशी स्थलांतरित झालेली व्यक्ती म्हणजे इमिग्रंट म्हणून माझ्या मनात एक खंत असे, शंका असे. ती अशी की आम्ही आमची मुळं आणलीत पण ज्या मातीत रुजलो होतो ती माती आणली नाही. ही माती म्हणजे आपल्या समाजात असणाऱ्या लोकांच्या सद्भावना, आपुलकी, प्रोत्साहन, त्यांचं आपल्या सुखदुःखात सामील होणं, त्यांचा (खास मराठी लोकांचा) श्रेष्ठ बुद्ध्यांक, उच्च दर्ज्याच्या आवडी-निवडी, त्याचा नवीन आलेल्या लोकांवर पडणार प्रभाव... इत्यादी बरेच काही संस्कारदायी असे! ही खंत नाहीशी होण्याचं कारण म्हणजे आम्ही सर्वांचे आवडते स्नेही गीता आणि सतीश जोशी यांनी अतिशय कल्पकतेने योजलेले दिवाळी पहाटेचे संमेलन !

ही दिवाळी पहाट आम्ही साजरी केली सकाळी नऊ वाजता गीता-सतीश यांच्या ॲरिझोनातील चॅंडलर येथील घरात. एक सुंदर आणि रसिकतेने सजविलेलं घर, पाहुण्यांचं आदरातिथ्य करण्यास आतुर असलेलं घर, मित्रमंडळींच्या हास्य विनोदानं भरलेलं घर, एक अमेरिकेतलं मराठी घर !

अमेरिकेतले मराठी लोक का बरं आपले सण उत्साहात साजरे करतात? ह्या प्रश्नाचं उत्तर टागोरांनी एका विधानात दिलं आहे; ते विधान असं की मातीच्या बंधनातून मुक्ती म्हणजे झाडासाठी स्वातंत्र्य नव्हे ! ह्या वाक्याचे प्रतिसादच जणू त्या दिवशी गीता-सतीश ह्यांच्या घरात ऐकू येत होते.

ह्या दिवाळी पहाटेचं दृश्य जर शंभर वर्षांनंतर कुणी इतिहासाच्या अभ्यासकाने इलेक्ट्रॉनिक आर्काईवजमध्ये पाहिले तर त्यांना काय दिसेल? तर उत्तर अमेरिकेतील शांतताप्रिय, कलाप्रेमी, बुद्धिमान, समृद्ध अश्या मराठी समाजातील लोक सुंदर पोषाख परिधान करुन लगबगीने एका सजविलेल्या घरात जात आहेत. प्रत्येकाच्या हातात ह्या संमेलनासाठी तयार केलेला पदार्थ आहे. दिवाळी पहाटेचा सोहळा दारात रेखलेल्या आकर्षक रांगोळीपासून सुरु होतो आहे. घरात पाहुण्यांची उत्तम सोय केलेली आहे. स्वयंपाकघरातील टेबलवर विविध प्रकारच्या पारंपरिक दिवाळीच्या खाद्यपदार्थांची आरास मांडलेली आहे. ते दृश्य शब्दात वर्णन करणे कठीण असल्यामुळे पाहुणे मंडळी त्याचे फोटो घेऊन आप्तेष्टांना पाठवताहेत. मागील अंगणात पाहुण्यांसाठी बसण्याची, खाण्याची, गप्पा मारण्याची व्यवस्था केलेली आहे आणि हे गप्पिष्ट पाहुण्यांच्या पथ्यावरच पडले आहे. त्या इतिहासकारांना आपण परिकथा पाहतो आहोत, असे वाटेल; पण हा सोहळा काही फक्त खाण्याचा आणि गप्पा करण्याचा नव्हे; तर दिवाळीच्या शुभ प्रसंगी उत्साहवर्धक, संस्कारदायी, मनोबल वाढवणारे विचार ऐकण्याचा मांडण्याचा, त्यावर चर्चा करण्याचा सुद्धा आहे हे गीता आणि सतीशने आखलेल्या "share your Inspiring thoughts" या पाहुण्यांना केलेल्या आवाहनाने सिध्द झाले. आधीच सूचना दिल्यामुळे बहुतेक लोक या विषयी विचार करुन आले होते. आणि प्रत्येकाने समोर येऊन आपले विचार शब्दातून, कवितांमधून, गाण्यातून मांडले. सर्वांचीच मनस्थिती यामुळे अधिकच उल्हसित झाली. प्रत्येकाला लोकांशी बोलण्याची संधी मिळाल्यामुळे ही केवळ एक नेहमीसारखी सामान्य पार्टी न राहता ह्या एकत्र येण्याला अर्थपूर्णता आली आणि हे संमेलन त्यामुळे जास्त संस्मरणीय झाले, ह्यात शंका नाही.






गीता-सतीशने (आणि फिनिक्समधील इतर जुन्या कुटुंबांनीसुद्धा) तन-मन-धन खर्च करून ह्या आणि अश्या अनेक स्नेह-संमेलनाचे आयोजन केले आहे. ह्या एकत्र येण्यात स्थलांतरितांच्या स्मरणरंजनाला उत्तर आहे, मैत्रीची ऊब आहे, लहानपणी आते-मामे भावंडांबरोबर साजऱ्या केलेल्या दिवाळीचे प्रतिबिंब आहे, नवीन परंपरांची चाहूल आहे, जुन्या-नव्याचा संगम आहे. आता कित्येक मुळं रुजली आहेत, कित्येक झाडं आत्मविश्वासानं बहरली आहेत...

या अमेरिकेतली मराठी मातीत ! आणि आता स्थलांतरित हा शब्द अंधुक होत चालला आहे.

- **भाग्यश्री बारलिंगे**, मेसा, ॲरिझोना

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## दिवाळी

**"उत्सव प्रकाशाचा .. अंतरंग उजळण्याचा"**
दारी सजले तोरण भारी ,
अंगणी उभी कंदिलाची स्वारी.
कुशीत घेऊनि उत्सवाचा प्रकाश ..
दीपावलीच्या रंगात रंगले आकाश.
खमंग फराळ- गप्पा गोष्टी,
खुलवुया पंगती आप्तांसोबती.
उजळूया अंतःकरण..सारुनी अंधार अज्ञानाचा,
करूया साजरा "उत्सव प्रकाशाचा"
पणती हि प्रेमाची प्रत्येक ह्रीदयी उजळावी,
नव्या अर्थाची नवी दिवाळी साजरी व्हावी.

- **जया राणे**, पेटन, कोलोरॅडो

## नाविन्यपूर्ण मराठी नाटकाचा अमेरिकेत यशस्वी दौरा: "शिकायला गेलो एक"

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या India Programmingच्या चमूने नुकताच श्री. प्रशांत दामले यांच्या "शिकायला गेलो एक" या नाटकाचा यशस्वी दौरा आयोजित केला होता. त्याचा वृत्तांत:

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या India Programming साठी भरपूर entries येतात, पण एक विशेष entry आली – श्री. प्रशांत दामले यांच्या "शिकायला गेलो एक" या नाटकाची. प्रशांत दामले बृहन्महाराष्ट्र मंडळ किंवा अमेरिकन मराठी मंडळांसाठी नवीन नाहीत, पण हे नाटक भारतात गाजत होतं आणि अमेरिकेतही उत्सुकता वाढली होती . मग काय, दामलेशी चर्चा झाली, औपचारिक गोष्टी ठरल्या – शो, प्रवास, मानधन वगैरे.

साधारणपणे १० किंवा जास्तीत जास्त १२ प्रयोगांचं गणित असतं, पण २०२४-२६ मध्ये लहान मंडळांना मोठ्या बॅनरचं नाटक उपलब्ध करून देण्याचा बृहन्महाराष्ट्र मंडळाचा आग्रह होता.

ही गोष्ट आम्ही दामलेना सांगितली, ते म्हणाले, "काही हरकत नाही, मी लहान आणि मोठ्या मंडळांसाठी, लोकांच्या घरात राहायला तयार आहे, ज्यामुळे lodging चा खर्च वाचेल." मग काय, आम्हाला फारच हुरूप आला. बऱ्याच लहान मंडळांची बोलणी झाली, आणि पाहता पाहता १० प्रयोगांवरून १६ प्रयोगांची सुपारी दामलेना बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे मिळाली.

ही गोष्ट आनंदाची होती, पण त्याचबरोबर हे शिवधनुष्य कसं पेलणार याची काळजी लागली – P3 VISA query, टॅरिफमुळे नाटकाच्या flex delivery delay, अमेरिकेत government shutdownमुळे विमान वाहतूक खोळंबली.

हे सर्व असतानाही सर्व विमान-प्रवास सुरळीत पार पडले, प्रत्येक शो housefull झाला – म्हणजे जवळपास ८,००० प्रेक्षकांपर्यंत हा नाट्यप्रयोग पोहोचला. शेवटचा शो New Jersey येथे झाला, १,५०० पेक्षा जास्त प्रेक्षकांनी उपस्थिती लावली. त्यानंतर काही दिवसांतच दामले यांच्या १३,३३३ व्या नाट्यप्रयोगाचा टप्पा पार पडला.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या India Programmingचे काम सांभाळताना खूप शिकायला मिळालं, अनेक लोकांची ओळख झाली. खूप मंडळी धावून आली, BMM ची पूर्ण committee माझ्या पाठीशी होती – अध्यक्ष प्रसाद पानवळकर, कोषाध्यक्ष संतोष साळवी, सचिव नरेंद्र कल्याणकर, कार्यकारिणी मेधा गोडबोले, आनंद चौथाई, राहुल देशमुख, गौरव पटवर्धन, आणि BMM volunteer हर्षद अणिगेरी, प्रत्येक मंडळ अध्यक्ष, EC आणि volunteers. आमच्या immigration lawyer स्वप्नाली केळकर आणि Click on Tours चे अतुल परळकर यांनी सर्व travel tickets आणि plane boardings व्यवस्थित हाताळली – १४ flights, १० लोक, २१ bags!

- **पुरू ठाकरे, कार्यकारिणी सदस्य,**
India Programming, बृहन्महाराष्ट्र मंडळ






## वाचकांचे विचार

नमस्कार ,
सुंदर अंक आहे. (दिवाळी अंक)
**-किरण शिवहर डोंगरदिवे**

## 'अवघा रंग एकचि झाला'— बे एरियाच्या रंगभूमीवर संगीत नाटकाचा सुवर्ण क्षण

कॅलिफोर्निया मधील सॅन फ्रॅन्सिस्को बे एरिया येथील रसिकांना दिवाळीनिमित्त, २ नोव्हेंबर रोजी, एक अद्वितीय सोहळा अनुभवायला मिळाला. महाराष्ट्र मंडळ बे एरिया (MMBA) निर्मित, डॉ. मीना नेरुरकर लिखित आणि श्री. शीतल डोळस दिग्दर्शित 'अवघा रंग एकचि झाला' या संगीत नाटकाने कॅलिफोर्नियाच्या बे एरिया येथील मराठी रंगभूमीच्या इतिहासात नवा अध्याय लिहिला.

या नाटकात कीर्तन परंपरेशी निगडित एका कडव्या तत्वनिष्ठ पिढीचा आणि आधुनिक विचारांच्या नव्या पिढीचा संघर्ष मांडण्यात आला. हा भावनिक संघर्ष अत्यंत प्रभावीपणे रंगमंचावर उतरवण्यात आला. भक्ती, संगीत आणि अभिव्यक्ती यांचा हा प्रवास प्रेक्षकांच्या मनाला खोलवर भिडला.

पंडित रघुनंदन पणशीकर यांनी या नाटकाचे संगीत दिग्दर्शन केले आहे. सर्व गाणी, लाइव्ह स्वरूपात रंगमंचावर सादर करण्यात आली. अभिनय, गायन, संगीत, नेपथ्य, प्रकाशयोजना, वेशभूषा दिग्दर्शन हे इतक्या कौशल्याने जुळले की प्रेक्षकांनी ते "ब्रॉडवे दर्जाचं नाटक" असल्याचं गौरवपूर्ण मत दिलं. ८०० हून अधिक प्रेक्षकांच्या टाळ्यांनी सभागृह अनेकदा दुमदुमले, तणावपूर्ण प्रसंगात नीरव शांतता पसरली तर भावपूर्ण प्रसंगात रसिकांना अश्रू अनावर झाले.

### स्थानिक कलाकारांची अभिमानाची झेप

स्थानिक कलाकारांना उत्तम संधी मिळवून देण्याचं मंडळाचं ध्येय असून, आजपर्यंत एवढ्या मोठ्या सभागृहात फक्त भारतातील कलाकारांचे कार्यक्रम झाले होते. एवढ्या मोठ्या सभागृहात आणि एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रथमच स्थानिक कलाकारांचा कार्यक्रम होत असल्याचं प्रतिपादन मंडळाचे अध्यक्ष श्री. भास्कर रानडे यांनी केलं.

### ऐतिहासिक पाऊल

बे एरियाच्या मराठी रंगभूमीच्या इतिहासातील हे पहिलेच संगीत नाटक आहे. या ऐतिहासिक पावलावर पाऊल ठेऊन यापुढे अनेक संगीत नाटकांची निर्मिती इथे होईल असे प्रतिपादन दिग्दर्शक श्री. शीतल डोळस यांनी केले. पुढे ते म्हणाले कि १५०० चौ. फु. ची भव्य नेपथ्य योजना, २५० पेक्षा अधिक लाइट–साउंड cues, १०० जणांच्या टीमचे २००० तासांपेक्षाही जास्त परिश्रम या नाटकामागे होते. यावेळी प्रथमच 3D modeling करून नेपथ्य रचना तयार करण्यात आली होती. दिवाळीचा फराळ, चंदन आणि सोनचाफ्याचे अत्तर, स्त्रियांसाठी मोगऱ्याचे गजरे, असा स्वागताचा थाट होता.

### संगीताची रेलचेल

नाट्यगीत, भावगीत, अभंग, कीर्तन यांसोबत Bollywood, Western आणि Fusion अशा १४ संगीत प्रकारांतील ३० रचनांची रेलचेल या नाटकामध्ये होती. कलाकारांच्या Live गायनाने सभागृह मंत्रमुग्ध झालं; "पिलू उडोनिया" सारख्या गीतांवर डोळे पाणावल्याचं अनेकांनी सांगितलं. नैसर्गिक अभिनय, उत्कृष्ट गायन, मोहक नृत्य, प्रभावी प्रकाश योजना यांच्याबरोबरच, उत्तम वेशभूषा आणि जादूप्रमाणे क्षणात बदलले जाणारे वेष यांनी रंगमंचावर काळाचा प्रवास समर्थपणे उभा केला. प्रचंड टाळ्या, once more व standing ovation यांनी सभागृह दणाणून गेले.



**कलाकार:** योगिता भातखंडे, मिलिंद भांडारकर, अमोल परांजपे, मनोज ताम्हनकर, गौरी अपसिंगेकर-जोशी, शलाका डोळस

**वाद्य वृंद:** अजिंक्य रानडे, मिहिका महाराणा, राहुल झिंगडे, आयुष तऱ्हाळकर

**नेपथ्य:** संजय पाचपांडे, प्रणिता साखळीकर, मानसी हवालदार, अमित करमरकर, समीर देवळीकर, दीपक तारे

**प्रकाश योजना:** अद्वैत जोशी

**वेशभूषा:** मीरा ताम्हनकर, शर्वरी डोळस



**रसिकांच्या निवडक प्रतिक्रिया:**

- अप्रतिम! अभिनय, गायन, संवाद, प्रकाश, नेपथ्य - प्रत्येक घटक जागतिक दर्जाचा होता.
    - अमेरिकेतही भारताइतकेच दर्जेदार कलाकार आणि कलाकृती निर्माण करण्याची क्षमता आहे, हे या नाटकाने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.
- सर्व कलाकारांची कामे अतिशय उत्कृष्ट झाली आहेत. तरुण कलाकार अमोल परांजपे (सोपान) आणि शलाका डोळस (जेनी) याची गाणी अतिशय उत्तम झाली.
- या संचाचे पूर्ण अमेरिकेतच नव्हे तर भारतासह जगभर प्रयोग व्हावेत इतकी उच्च निर्मिती आहे.

**- शीतल डोळस, बे एरिया, कॅलिफोर्निया**

## एका नाटकाची गोष्ट...!

२०१२ साली डोक्यावर अक्षता पडल्या आणि 'अन्नासाठी दाही दिशा आम्हां फिरविसी जगदीशा...' हे अक्षरश: खरं झालं. नवऱ्याच्या कामामुळे आम्ही कधी भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया असे फिरत होतो. मुलगी मोठी होताना एका ठिकाणी स्थिर होऊयात या विचाराने, पुन्हा एकदा नवऱ्याच्या कामाला वाव असणारे ठिकाण निवडले गेले ते म्हणजे वॅनकूवर कॅनडा! नवीन देश फिरताना, तिथल्या लोकांमध्ये सामावून जाण्याचा प्रयत्न करताना, वातावरण, भोवताल या सगळ्यांशी जुळवून घेताना छान वाटत होतं. पण सण-वार आले, भारतात कुटुंबातले सगळेजण नाटकाला, गाण्यांच्या कार्यक्रमाला गेल्याचे कळले की जीव खंतावयाचा. तो दिवस उदास असायचा आतून माझ्यासाठी...स्वतःचं गाणं तर अनोळखीच वाटायचं! रियाज करायचा पण तो बरोबर होतो की नाही हे सांगायला गुरू जवळ नाही आणि तेव्हा online शिकण्याचे दिवस नव्हते. २०१८ साली जेव्हा पहिल्यांदा कॅनडामध्ये आलो तेव्हा इथलं मराठी मंडळ एक विसाव्याचे ठिकाण झालं. आमच्यासारखे हौशी कलाकार एकत्र येऊन संगीत, नाटकं यात जीव रमवत होते.

२०२२ साली शैलेश अरोरा या नाटकवेड्या मित्राने निवडक संगीत नाटकातले काही प्रवेश घेऊन 'मर्मबंधातली ठेव ही' हा नाट्यसंगीताचा कार्यक्रम केला. त्याला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन शैलेशने एक संपूर्ण २ अंकी संगीत नाटक करायचा विचार मांडला. त्यावर पहिला प्रतिसाद हा होता की, कॅनडामध्ये, नॉर्थ अमेरिकेत कोण संगीत नाटक बघणार? आजकाल संगीत नाटक बघणारे रसिक प्रेक्षक महाराष्ट्रात कमी होतायेत तर इथे त्यांची गणना ती काय! आणि दुसरा विचार मनात असाही आला की, माझे गुरूजी नेहमी सांगतात की, कलेची साधना करणाऱ्या शिष्याने प्रयोग / रियाज करत राहिलं पाहिजे. प्रयोग करून बघितल्याशिवाय कसं कळणार की मनातला विचार विचार गळ्यातून निघतो आहे की नाही, निघत असेल तर कसा निघतो, कुठे चुकतोय. चुकायला हरकत नाही पण का चुकतोय आणि कसा दिसतोय / ऐकू येतोय, आपल्या गळ्याला शोभतोय का याचा विचार करायला हवा, आणि हे करणाऱ्याकडे डोळसपणे पाहायला हवं. गुरूची शिकवण म्हणजे ब्रह्म वाक्य! त्यामुळे प्रयोग करून पाहायला काय हरकत आहे इतका सरळ विचार करून नाटकातल्या मुख्य स्त्री भूमिकेसाठी हो म्हंटलं. व्यंकटेश माडगूळकरांनी लिहिलेलं 'पति गेले ग काठेवाडी...' हे २ अंकी नाटक आणि त्यातली पात्र निश्चित केली गेली. संगीताची जाण असणारे आणि अभिनय करू शकणारे असे १५ जण निवडले गेले. नाटक फेब्रुवारी २०२४ मध्ये करायचं ठरलं होतं. नाटकात माझी एकटीची ८ पद आणि शाहीर आणि सूत्रधारांची मिळून ८-१० गाणी अशी एकूण १७ -१८ पद होती. मोहन दादांनी आमची तालीम करून घ्यायची जबाबदारी घेतली, श्री. मोहन भिडे हे नाव नॉर्थ अमेरिकेत शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीताच्या दुनियेशी संबंधित असणाऱ्या लोकांना अपरिचित नाही. त्यांचं संवादिनी वादन आणि साथ अतिशय कसदार आणि अगदी सहज. कोणताही अभिनिवेश नाही त्यात. नाटकासाठी आवश्यक असणारे तबला आणि ढोलकी वादक मिळाले आमच्या नशिबाने! आमच्या वॅनकूवरचा तरुण आणि अतिशय गुणी तबला वादक हृदय बुद्धदेव, सिएटल मधून ढोलकी आणि तबल्याची उत्तम साथ करणारे सत्यजित लिमये नाटकात साथ करायला तयार झाले. आवश्यक तेवढ्या तालमींना ते यायचे अगदी सिएटल वरून सुद्धा ! संगीत नाटक हा एक अनुभव आहे. बालगंधर्वांचा सुवर्ण काळ आपण पाहिला नाही पण वर्णनं ऐकली आहेत. संगीत नाटक जेवढं कलाकारांच्या अभिनय आणि संगीतातून उभं राहतं तेवढंच ते त्याच्या नेपथ्यातून, प्रकाश योजनेतून आणि पार्श्वसंगीतातून अधिक खुलतं हे लक्षात ठेवून पात्रांची वेशभूषा, नाटकाच्या प्रवेशानुसार होणारे नेपथ्यातले बदल म्हणजे पेशवेकालीन घर, राजवाडा, काठेवाडी प्रांतानुसार बैठकी, मागची रंगसंगती या सगळ्यासाठी आमचे हौशी पडद्यामागचे कलाकार खूप मेहनत करत होते. नाटक अधिकाधिक सत्यासदृश दिसावं म्हणून वेशभूषा आणि गरज पडल्यास नेपथ्याची काही सामग्री भारतातून आणली गेली.



प्रयोग उत्तम व्हावा म्हणून कलाकारांनी पदरचे पैसे घालून स्वतःची वेशभूषा जमवली- Beg, Borrow or buy हे सूत्र तंतोतंत पाळलं. रंगीत तालमी सुरू झाल्या आणि हळूहळू नाटकाने स्वतःचे अंतरंग उलगडायला सुरूवात केली. पहिला प्रयोग वॅनकूवर मध्ये आमच्याच मंडळात झाला. आपल्या होम ग्राउंडवर बऱ्याचदा खेळाडू चांगलाच खेळतो. त्याप्रमाणे, तो प्रयोग छानच झाला आणि त्याच कौतुकही भरपूर झालं. आम्हीही खूष की, झाला बाबा एकदाचा प्रयोग, सुमारे २०० प्रेक्षकांनी आपला हा नवीन प्रयोग प्रेमाने बघितला! या प्रयोगाच्या अभिनवतेची कुणकुण कॅनडा मधल्या इतर मराठी मंडळांना लागली आणि कॅलगेरी आणि एडमंटन येथील मराठी मंडळांनी प्रयोगासाठी आमंत्रित केलं. दोन्हीकडच्या सुमारे ४०० प्रेक्षकांना विरळा पाहायला मिळणाऱ्या संगीत नाटकाचा आनंद देऊन परतल्याचं अतीव समाधान होतं. पण म्हणतात की, आनंद वाटला की तो वाढतो. त्याप्रमाणे, २०२५ मध्ये आम्ही अमेरिकेतल्या सॅनफ्रान्सिस्को, बे एरिया मराठी मंडळ आणि व्हिक्टोरिया आयलंड येथील मराठी मंडळात यशस्वी प्रयोग केले. साधारण ३०० लोकांनी प्रयोग पाहिल्याचा आणि आवडल्याची पोचपावती दिल्याचं आनंद होताच सोबतीला. बरं, आम्ही कोणीही कलाकार हे प्रयोग करण्यासाठी कोणत्याही प्रकारचं मानधन घेत नाही. हे सगळे प्रयोग कलाकारांनी केवळ प्रवास खर्च आणि राहण्याची सोय एवढ्याच मिळकतीवर केलेत.

ही झाली कलाकार म्हणून नाटकाची दर्शनी बाजू - सुंदर आणि लोभस! पण नॉर्थ अमेरिकेतल्या मराठी मंडळात सदस्य म्हणून काम केल्यावर आयोजन, नियोजन, त्यातली आर्थिक गणितं नजरेआड करून चालत नाहीत. त्याबद्दलच्या वास्तवाचं भान ठेवावं लागत याची आम्हाला सगळ्यांना आणि आपल्यालाही पूर्ण कल्पना आहे. इतर ठिकाणच्या मंडळात प्रयोग करताना अनेक मर्यादा असतात. मंडळाच्या आकारानुसार मिळू शकणारा प्रवास खर्च, नाट्यगृहाची / रंगमंचाची उपलब्धता, राहण्याची सोय या सगळ्याची प्रसंगी तडजोड करत नाटकाच्या मूल्यांशी कोणत्याही प्रकारची तडजोड न करता हे प्रयोग केले गेले आहेत. प्रत्येक प्रयोगासाठी सर्व कलाकार नव्या जोमाने तालीम करतात. विनामूल्य प्रयोग करणं, त्याच्या आधीच्या तयारीसाठी पुरेसा वेळ देणं, संघातल्या एकूण कलाकारांची संख्या कमी करावी लागत असल्यामुळे पडद्यामागचे आणि प्रत्यक्ष नाटकादरम्यान नेपथ्य सांभाळणे हे सर्व ओघाने आलंच. आणि हे करण्यासाठी नाटकावर प्रेम करणारी लोक लागतात, कलाकार लागतात जे आमच्या संघात आहेत. आणि मला सांगताना आनंद आणि अभिमान वाटतो की, नॉर्थ अमेरिकेत संगीत नाटकाचे ५ प्रयोग करणारे आम्हीच पहिले असू! आम्हाला तर मजा येतेच आहे पण हा संगीत, अभिनयाचा ठेवा भारताबाहेर वाढणाऱ्या आमच्या पुढच्या पिढयांनाही मिळावा इतका शुद्ध हेतू आहे.

दर प्रयोगागणिक नव्याने मला माझं पात्र भेटतं आणि भावनेचा एखादा कंगोरा किंवा नाट्यपदांतली एखादी नवीन मुरकी, तान शिकवून जाते. या नाटकाने काय दिलं विचाराल तर मी म्हणेन, आमच्या कलेला एक नव्या लोलकातून बघण्याची, त्यातून दिसणाऱ्या नव्या पैलूंचा अभ्यास करण्याची एक संधी दिली, प्रयोग करत राहण्याची प्रेरणा दिली! माणूस म्हणून समृद्ध करणारा हा प्रवास इतक्यात संपणार नाही आणि संपू नये अशी मनापासून इच्छा आहे. या प्रवासात अनेक टप्पे येतील आणि आणि अजून अनेक शहरांचे थांबे असतील अशी आशा आहे मला. कारण 'याजसाठी केला होता अट्टाहास, प्रयोगाचा दीस गोड व्हावा...'

या प्रवासात आम्ही समृद्ध झालोच पण ही समृद्धी आता फक्त आमच्यापुरती उरली नाही, तुमच्यापर्यंत पोहोचतीये आणि त्यातून तुम्हालाही काहीतरी नवीन आणि आनंददायी मिळेल याची खात्री आहे.

**- अश्विनी खाडिलकर**

व्हॅनकूवर, ब्रिटिश कोलंबिया, कॅनडा

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## गमावलेली संधी

**प्र**वासाची आवड मला लहानपणापासून आहे. यूरोपमधील काही देश बघितल्यावर,स्वित्झर्लंडचा दौरा करण्याची इच्छा मी माझ्या मोठ्या भावाबरोबर व्यक्त केली. तेव्हां त्याने सुचवले की, आपण रेल्वेने तो सर्व देश बघूया. मलाही ती कल्पना आवडली. त्यामुळे, सप्टेंबर २०११ मध्ये आम्ही; माझा मोठा भाऊ-अरविंद, वहिनी-सुनीला, माझी पत्नी-शीला, आणि मी, अशा चौघांनी एका टूर कंपनीबरोबर प्रवास करण्याचे ठरवले .

आमची रेल्वे सफर झुरिक पासून सुरु होऊन एका आठवड्यानंतर झुरिकला परतणार होती. आमच्या ग्रुपमध्ये एकंदर ३८ जणांचा समावेश होता. त्यात २० अमेरिकन (आम्ही चौघे मूळचे भारतीय), १० ब्रिटिश, व ८ ऑस्ट्रेलियन होते. तर आमचा टूर डायरेक्टर होता मार्क, रोम, इटलीचा!

सफारीतील पहिला मुक्काम झुरिक पासून दक्षिणेला ५२ किलोमीटर अंतरावरील लुसर्न (Lucerne) मध्ये होता. हे शहर लुसर्न तलावाच्या काठावर वसलेले आहे. त्याच्या भोवतीच्या डोंगर रांगांमुळे हा प्रदेश चांगलाच रम्य दिसतो! त्यामुळे इथे अनेक पर्यटकांची रीघ लागलेली असते. तसेच कित्येक निर्माते स्वित्झर्लंडचे निसर्ग सौंदर्य,आपल्या चित्रपटात दाखवण्यास उत्सुक असतात. सन



१९८९ नंतर काश्मीरमध्ये आतंकवाद बळावल्याने हिंदी चित्रपट निर्मात्यांची नजर स्वित्झर्लंड कडे वळली. त्यात पुढाकार प्रसिद्ध हिंदी चित्रपट निर्माते यश चोप्रा यांनी घेतला होता. त्यानंतर, हिंदी व्यतिरिक्त इतर भारतीय भाषांतील चित्रपट /मालिका निर्मातेही चित्रीकरणासाठी इथे येऊन त्यांचे अनुकरण करू लागले .



आमच्या टूर कंपनीने लुसर्न मधील एका रेस्टॉरंट मध्ये रात्रीच्या जेवणासाठी नेले. तिथल्या Swiss Folklore Show मध्ये Yodelling चा समावेश होता. आमच्या हॉटेल पासून रेस्टॉरंट मध्ये जाताना मध्ये एक लाकडी पूल - Chapel Bridge लागला. ह्या पुलाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या बाहेरची बाजू (दर्शनी भाग) अनेक रंगीबेरंगी फुलांच्या कुंड्यांनी सजवलेली होती. हा पूल पुढे एका हिंदी चित्रपटात तसेच एका मराठी मालिकेतही पाहण्यात आला.

प्रथम Yodelling म्हणजे काय हे समजावून घेणे आवश्यक आहे. हा गाण्याचा प्रकार आल्प पर्वतातील डोंगराळ भागात वापरला जातो. तिथले गुराखी आपल्या गाई-वासरांच्या कळपाला तसेच इतर गुराख्यांशी संवाद साधण्यासाठी योडेलींगचा उपयोग करतात. हिंदी सिने संगीतात प्रख्यात गायक - किशोर कुमार योडेलींग साठी मशहूर आहेत.



आतापर्यंतच्या प्रवासाच्या अनुभवांवरून माझ्या लक्षांत आले की क्रूझ किंवा रिसॉर्टमधील रेस्टॉरंट मध्ये पर्यटकांना रिझवण्यासाठी एक पद्धत आहे. पगारी कलाकाराऐवजी प्रेक्षकातून काही लोकांना आमंत्रित करून त्यांच्या मार्फत बाकीच्यांची करमणूक करायची. कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, भाग घेणाऱ्यांना एक टी-शर्ट किंवा अशा प्रकारची स्मरण वस्तू (Souvenir) दिले की काम भागते. आधुनिक व्यवस्थापन (Management) भाषेत ती Win-Win परिस्थिती बनते.

रेस्टॉरंट मध्ये स्थानापन्न झाल्यावर स्टेजवर एक माणूस आला आणि त्याने आम्हां सर्वांचे ड्रिंकने स्वागत केले . त्यानंतर प्रेक्षकातून काही जणांना स्टेजवरील आल्प (स्विस) हॉर्न वाजवण्याचे

आवाहन केले. हे वाद्य लांबलचक असून एखाद्या मोठ्या नळकांडी सारखे दिसत होते. वरच्या बाजूने फुंकले कि त्याच्या खालच्या तोंडातून (कर्णा) आवाज निघतो. मीही मोठ्या उत्साहाने ते वाजवण्यासाठी स्टेजवर गेलो. परंतु समजलो होतो कि वाजवणे तेवढे सोपे नव्हते. मी बरेच वेळा, फुंकण्याचा प्रयत्न केला परंतु दुर्दैवाने काहीच आवाज निघाला नाही. शेवटी हताश होऊन मी माझ्या जागेवर येऊन बसलो. आणि ती माझी चूक नंतर माझ्या लक्षात आली.

त्यानंतर स्टेज वरील माणसाने Yodelling साठी प्रेक्षकातील काही जणांना आवाहन केले. प्रेक्षकात ५/६ जण त्यात सहभागी होण्यासाठी स्टेजवर गेले. मी आल्प-हॉर्न वाजवण्यात अपयशी ठरल्याने निराश झालो होतो त्यामुळे योडेलींग साठी भाग घेण्याचे मी टाळले. कारण मागच्या वेळेसारखे माझे मलाच हसू करून घ्यायचे नव्हते. ती माझी 'गमावलेली संधी' मला अजूनही आठवते. योडेलींग साठी माझा आवाज किशोर कुमार सारखा नसला तरी त्याचे योडेलींग चे गाणे गाउन व नंतर त्या चित्रपटाविषयी कहाणी सांगून सह-पर्यटकांचे मनोरंजन मला करता आले असते.

सन १९५७ मध्ये किशोर कुमारचा एक चित्रपट - 'बेगुनाह' आला होता. त्यातील किशोर कुमारचे योडेलींग असलेले 'आज न जाने पागल मनवा काहे को घबराये, हिच हिच हिचकी आये रे तबियत पिचकी पिचकी जाये!' हे गाणे त्याकाळात प्रसिद्ध झाले होते. हा चित्रपट १९५४ साली आलेल्या हॉलिवूडच्या 'Knock On Wood ' ची कॉपी होती त्यात प्रसिद्ध विनोदी डॅनी के ह्यांनी प्रमुख भूमिका केली होती.

बेगुनाह चित्रपटाचे संगीतकार - शंकर व जयकिशन - माझे आवडते असल्याने प्रदर्शित झाल्यावर मी तो चित्रपट लगेच बघितला. प्रदर्शित झाल्यावर काही आठवड्यानंतर, डॅनी के मुंबईत आले असताना त्यांनी बेगुनाह सिनेमा पाहिला. तो बघितल्यानंतर ते तडक लॉस एंजेलिसला परत गेले आणि मुंबईला परत आले ते आपल्याबरोबर अमेरिकन निर्मात्याच्या वकिलांचा ताफा घेऊन. त्या वकिलांनी बेगुनाह च्या निर्मात्यांना मुंबईच्या कोर्टात खेचले कारण भारतीय निर्मात्याने आपला चित्रपट 'Knock On Wood' वर आधारित आहे असा उल्लेख न केल्याने, तो CopyRight चा भंग ठरतो. तेव्हा बेगुनाह चित्रपट बंदी घालावी अशी मुंबई कोर्टाला विनंती केली. कोर्टाने ती मागणी मान्य करून चित्रपटाच्या सर्व प्रति नष्ट करण्याचे फर्मान काढले. त्यामुळे आज त्या चित्रपटाची एकही प्रत बघायला मिळत नाही.

एखादी गोष्ट करणे शक्य असून ती करण्याची संधी हुकली, ह्याची जाणीव झाली की आपल्याला चुटपुट लागते. मीही त्याला अपवाद नाही. आजही कुठे किशोर कुमारचे योडेलींग गाणे ऐकले की मला त्या गमावलेल्या संधीची आठवण होते आणि मग अशा वेळी 'I Kick Myself' - थोडक्यात त्यासाठी मी स्वतःलाच दोष देत बसतो.

विशेष म्हणजे हा लेख लिहिल्यानंतर ह्या चित्रपटाच्या फिती (Reels) संबंधी काही माहिती माझ्या वाचनात आली ती नमूद करतो. पुण्यातील Film Institute मध्ये 'बेगुनाह " चित्रपटातील एक छोटीसी चित्रफीत सापडली. त्यात प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक - जयकिशन पियानोवर बसून 'ए प्यासे दिल बेजुबा...' हे गाणे म्हणत आहेत. गायक मुकेश असले तरी जयकिशन नट म्हणून ह्यांत दृष्टीत पडतात.

**- सुधीर शं . कुलकर्णी,**

**- लेथम, न्यू यॉर्क**

-

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## हवीहवीशी हवाई

आपल्यातील अनेक जण गेल्या कित्येक वर्षांपासून अमेरिकेत स्थायिक असतील. प्रत्येकाला अमेरिकेत आल्यानंतर कधी एकदा अमेरिकेचे चार धाम फिरून होतील असे होत असते. बरोबर ओळखलंत तुम्ही. जसे आपल्या भारतात बद्रीनाथ,द्वारका,जगन्नाथ पुरी आणि रामेश्वर हे चार धाम तसेच उत्तर अमेरिकेतील हे चार धाम म्हणजे न्यूयॉर्क, शिकागो, कॅलिफोर्निया आणि फ्लोरिडा. हे चार धाम झाल्यानंतर आमचे डोक्यातील विचारचक्र सुरू झाले की आता येत्या नाताळच्या सुट्टीत नेक्स्ट डेस्टिनेशन कुठे ? मुलांची तर मोठ्ठी यादी तयार होती.कोणी म्हणे डिस्नी,कोणी मेक्सिको, कोणी अलास्का तर कोणी बहामाज..

या सगळ्या यादीतून आणि सगळ्यांना खुश करणारं डेस्टिनेशन निवडायची मोठ्ठी जबाबदारी नेहमीप्रमाणे माझ्यावर आली..दोन चार आठ दिवस जरा रिसर्च केल्यावर सगळ्यांना आयुष्यात एकदा तरी इथे जावेसे वाटते त्या ठिकाणाची मी निवड केली.. आतापर्यंत तुम्ही ओळखलंच असेल बरोबर, हवाई !! डिसेंबर म्हणजे तसा हवाई साठी पावसाळाच.. शेवटी निसर्गच तो..
बालकवींच्या ओळी नकळत मनाला समजूत घालत होत्या
"श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे;
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरूनी ऊन पडे."

हवाई द्वीपसमूहामधील आठ प्रमुख बेटांपैकी हवाई म्हणजेच बिग आयलँड आणि कवाई या दोन बेटांवर जाण्याचे आम्ही ठरवले.नॅशवील पासून ते हवाई साधारण विमानाने १७-१८ तासांचा प्रवास. सर्वांत पहिल्यांदा बिग आयलँड एअरपोर्ट वर उतरल्यानंतर नेहमीच्या एअरपोर्ट सारखे विमान गेटला पार्क न होता आम्ही डायरेक्ट विमानाच्या मागच्या दरवाज्यातून पायऱ्या उतरून धावपट्टीवरून चालत बॅगेज क्लेम सेकशन मध्ये पोहोचलो. हा अनुभव जरा नेहमीपेक्षा वेगळाच होता..अगदी छोटेसे पण मोठ्या दिमाखात मिरवणाऱ्या बिग आयलँड एअरपोर्ट वर आमचे अलोहा अलोहा म्हणत स्वागत झाले.

पुढील पाच दिवस बिग आयलँड वर फिरण्यासाठी आमचा प्लॅन सज्ज होता.. पारिजातक,चाफा, यांसारख्या सुगंधी फुलांनी आजूबाजूचा परिसर अगदी दरवळून गेला होता..

पहिल्या दिवशी अगदी सूर्याची किरणे भूमातेला स्पर्श करण्याच्या आत आमची गाडी वैपोई लुकआऊट कडे वळली. दवबिंदूंनी सजलेली हिरवीगार गवताची पाने, निळाशार समुद्र, किनाऱ्याला कवेत घेणाऱ्या पांढऱ्या शुभ्र लाटा आणि उगवत्या सूर्यनारायणाने पसरवलेली केशरी शाल अहाहा... अगदी फोटो फ्रेमच कोणी तरी उभी केलीय असं वाटतं होतं..तेथून पुढे अकाका फॉल्स येथे गेलो आणि कळले की तेथे ओपु नावाचा एक मासा आहे जो वॉटरफाल चढतो. आता या ओपुला शोधण्यासाठी बाळगोपाळांचीच काय पण मोठ्यांची पण उत्सुकता शिगेला पोहोचली. चॉकलेट फार्म टूर मध्ये पहिल्यांदाच कोको फळ पाहिले.



दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी चहाचा आस्वाद घेत असताना एका पिवळ्या धमक पक्षाचे आमच्या गॅलरीत आगमन झाले. त्याचे नाव कॅनरी. त्याचा उपयोग खाणीमध्ये कार्बन मोनाकसाइडचे अस्तित्व आहे का नाही यासाठी केला जात होता असे कळले. तेथील नॅशनल पार्क मध्ये हवाइयन देवदेवतांचे पुतळे सुध्दा पाहिले. जसे आपल्या भारतात जागोजागी चहाच्या टपऱ्या असतात तसेच हवाई येथे जागोजागी सगळीकडे शेव्ह आईस च्या टपऱ्या दिसतात. दिवसभर फिरून दमल्यानंतर मुलांसाठी खास आकर्षण होते ते रंगीबेरंगी दिसणाऱ्या या बर्फाच्या गोळ्याचे.

निसर्गाची विविध रूपे या एकाच बेटावर अनुभवायला मिळतात. म्हणजे एकीकडे निळाशार समुद्र, हिरवीगार झाडी तर दुसरीकडे व्होलकॅनो नॅशनल पार्क. मुलांनी तर व्होलकॅनो नॅशनल पार्कला एलियन लँड म्हणून घोषित करून टाकले. तेथे पसरलेल्या लावामध्ये कधी कोणाला गणपती, कोणाला मारुती तर कधी कोणाला आणखी काही असे दिसले. येथील पुनालू बेकरीचे मालसाडाज फार प्रसिद्ध आहेत. आपल्या डोनट्स सारखे दिसणारे पण



वेगवेगळ्या फळांनी बनवलेले पेरू, आंबा, अननस. आजही ती चव जिभेवर रेंगाळते आहे. क्षणात ऊन तर क्षणात आकाशात रंगांची उधळण करणारे इंद्रधनुष्य. मानवाच्या विभिन्न स्वभावांप्रमाणेच निसर्गाची ही रूपं बदलणे अगदी मनाला मोहून टाकणारं होते. त्यात हवाईचा मूळ पक्षी नेने. हा जर दिसला तर दुग्ध शर्करा योगच.

या पार्कमध्ये एक वेगळे फुल पहायला मिळाले ते म्हणजे ओहिया लेहुआ. ओहियाची झाडं हवाईत सगळीकडे दिसतात. पेलेच्या ज्वालामुखीतला तप्त लाव्हा त्याच्या मार्गातल्या सगळ्या गोष्टींना भस्मसात करत असला, तरी कालांतराने त्या मृत्यूच्या तांडवावर मात

करून पहिली नवजीवनाची खूण त्या लाव्हावर उगवते ती ओहियाच्या रोपट्याच्या रुपात! अर्थात त्याच्यासोबत त्याची लाडकी लेहुआही



असतेच! हे दोघे प्रेमी जीव एकत्र असतात तेव्हा सगळीकडे हसरं ऊन पसरतं. मात्र लेहुआला ओहियापासून तोडले तर लेहुआबरोबर देवताही अश्रू ढाळू लागतात अन मुसळधार पाऊस पडतो असे मानले जाते! म्हणून लेहुआचे फूल ओहियाच्या झाडावरून कधीच तोडू नये असं हवाईयन लोक मानतात.

कॉफी फार्ममध्ये कॉफीच्या झाडाच्या वेगवेगळ्या प्रजाती तसेच आजपर्यंत लिज्जत पापडाला लज्जतदार चव देणाऱ्या काळ्या मिरीचे झाड देखील बघितले..पोलालु वॅलीला जाताना रस्त्यात हवाईचा राजा कामेहामेहा यांचा भला मोठ्ठा पुतळा हवाइयन संस्कृतीची तेथील लोक आजही जपणूक करत असल्याची साक्ष देत होता.

व्हेल टूरमध्ये तर अमेरिकेच्या उत्तरेकडील अलास्काहून हवाई पर्यंत म्हणजे तब्बल  ६००० मैलाच अंतर ६-८ आठवडे प्रवास करून सगळ्यात आधी बेबी व्हेल्स आपल्या आई सोबत, मग मेल व्हेल्स, मग फिमेल व्हेल्स आणि मग प्रेग्नंट व्हेल्स अशा क्रमाने येतात आणि त्यांना मस्तपैकी लाटांवर मुक्तपणे संचार करताना पाहून हे आयुष्य खूप छोटे आहे आणि त्यातील प्रत्येक क्षण माणसाने प्राण्यांसारखच मनमुराद पणे जगला पाहिजे असं नकळतपणे मनाला सांगून गेला.

आता वेळ झाली होती ती बिग आयलँडला बाय बाय करून दुसऱ्या आयलँडवर जाण्याची..लिहूइ एअरपोर्ट वर आगमन झाले की फुलांच्या माळा (हवाइयन भाषेत - ले) घालून स्वागत करतात. या आयलँडवर सगळीकडे फिरताना जसे आपल्या भारतात भटकी कुत्री असतात तसेच अगदी पहाटे तीन साडे तीन पासूनच कुकुच कु करून सगळ्यांना उठवणाऱ्या कोंबड्या दिसतात. यामागची गोष्ट म्हणजे १९९२ मध्ये इनिकी नावाच्या हरिकेनमुळे या बेटावरील बऱ्याच लोकांनी पाळलेल्या कोंबड्यांची अंडी सर्वत्र इकडे तिकडे पसरल्याने या बेटावर खूप कोंबड्या आता मुक्तपणे संचार करताना दिसतात.

विमानातून केलेली नापाली कोस्टची टूर डोळे दिपवून टाकणारी होती. खिडकीतून एक नजर बाहेर टाकली तर आकाशात



सप्तरंगांची उधळण करणारे इंद्रधनुष्य आणि दुसऱ्या बाजूला नजर टाकली तर शांत निळ्यागार समुद्राच्या काठाशी महाकाय डोंगर..वरतून दिसणारी आखीवरेखीव शेती, सगळे एकदम स्वप्नवतच वाटत होतं. फेसबुकचे ओनर मार्क झुकरबर्ग यांचे देखील घर विमानातून का होईना पाहायला मिळाले. याच बेटावर हिंदू धर्माचे एक मंदिर आहे. त्याच मंदिराच्या परिसरात रुद्राक्षाची बरीच झाडे आहेत. आतापर्यंत जपमाळेत पाहिलेले रुद्राक्ष झाडाला कसे लागतात हे पाहण्याची उत्सुकता सगळ्यांनाच लागली होती. बरीच रुद्राक्ष खाली पडलेले असल्याने बोरं वेचावी तसे रुद्राक्ष आम्ही प्रत्यकाने टिपले.

हवाइची ट्रिप तेथील लुआऊ डान्स शो बघितल्याशिवाय पूर्णच होऊ शकत नाही.  नारळाच्या झाडांपासून बनवलेले त्यांचे ड्रेस आणि त्यात अग्नी वापरून केलेले नृत्य सगळे वाखाणण्यासारखं होते. सनसेट टूरला जाताना दुतर्फा निलगिरीची झाडे अनेक वर्षांची साक्ष देत होते. भल्या मोठ्ठ्या बोटीतुन नापाली कोस्टचं सौंदर्य डोळ्याचं पारणं फेडत होतं. बोटीतूनच दूरवर दिसणाऱ्या निहाऊ बेटाबद्दलची कथा थक्क करणारी आहे. या बेटाला फॉरबीडन आयलँड म्हणून देखील ओळखले जाते. रॉबिन्सन नावाची फॅमिली या बेटाचे मालक आहेत. यांच्या आमंत्रणाशिवाय कोणालाही या बेटावर जाता येत नाही. १३० लोकसंख्या असलेल्या या बेटावरील लोक इंटरनेट,टेलिफोन कशाचाही वापर करत नाहीत. दोन्ही बेटांच्या सौंदयाने एवढी भुरळ घातली होती की परतीचा प्रवास करायची इच्छाच नव्हती पण शेवटी निसर्गाची देणगी लाभलेल्या या देवभूमीला अगदी जड अंत:करणाने बाय बाय करून पुन्हा नॅशवील येथे सुखरूप पोहोचलो.

- **रसिका नेरकर,** स्प्रिंग हिल, टेनेसी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## दंत कथा

आज राहुलच्या घरी गडबड सुरू होती. पाहुणे घरी येणार म्हणून आई बाबा कामात होते, आवरत होते. बाबाचे मित्र आणि परिवार घरी जेवायला येणार होते. त्यांचा मुलगा नील आणि राहुल एकाच वर्गात असल्यामुळे दोघं अगदी बेस्ट फ्रेंड होते.

राहुलचे बाबा आणि नीलचे बाबा एकाच ठिकाणी काम करत होते. ही दोन्ही कुटुंब चार वर्षांपूर्वी साधारण एकाच वेळेला भारतातून अमेरिकेत आले. तेव्हापासून दोन्ही कुटुंबाची छान दोस्ती जमली होती.

राहुल मात्र आज जरा उदास उदास होता. त्याचा एक दात सध्या हलत असल्यामुळे तो फार बेचैन झालेला होता. पण नील येणार म्हणून तो आवरून त्याची वाट बघत बसला. थोड्याच वेळात

नील आणि त्याचे आई बाबा आले. मग मात्र दोघा मित्रांनी खेळण्यासाठी धूम ठोकली. एका बाजूला दाताचा त्रास सहन करत राहुल नील बरोबर खेळत होता. तेवढ्यात खेळण्यातला बॉल लागून त्याचा तो हलणारा दात अखेरीस पडला !

त्यावेळी नीलने राहुलला सांगितले की "आता तुझा दात पडला ना मग आता रात्री दंत परी येईल आणि तुझ्यासाठी गिफ्ट ठेवून जाईल" गिफ्ट मिळणार म्हटल्यावर राहुल खुश झाला, त्या निमित्ताने का असेना त्याच्या वेदना विसरला आणि खेळू लागला.

रात्र झाली. सगळ्यांची झोपायची तयारी सुरू झाली. पण राहुल मात्र जागत बसला होता. वाट बघत होता. काय झालं? झोपत का नाही? असे प्रश्न आई बाबाला पडले. तेव्हा त्याने कारण सांगितलं की "मी दंत परीची वाट बघत आहे. ती येईल आणि मला गिफ्ट देईल. म्हणून मी जागा राहणार आहे". आई बाबाला प्रश्न पडला हे तुला कोणी सांगितलं? मग त्यांना सगळं लक्षात आलं. पण त्याचं मन मोडायला नको म्हणून " येईल हं ती.... आत्ता झोप बरं " असं म्हणाले आणि अखेर राहुल झोपी गेला.

पण त्याच्या डोक्यातून मात्र दंत परी काही जात नव्हती. ती येणार ह्या आशेने तो रोज जागरण करू लागला, रात्रीत मध्येच उठून गिफ्ट आलंय का ते बघू लागला आणि अर्थात त्याच्या सकट सगळ्यांच्याच झोपेचं खोबरं झालं. आता मात्र आई बाबा वैतागले. रोज किती सांगणार त्याला परी येईल म्हणून! काय करायचं? हा प्रश्न त्यांना सतावू लागला.

परवा एकदा आई बाबा तीच चर्चा करत बसले होते. राहुलला कसं समजवायचं ह्याचा विचार करत होते. त्यांना हेही कळत होतं की लहान असताना अशा दंत कथा खऱ्या वाटतात.... आपणही त्यातून गेलो आहोत. पण हल्लीची पिढी जरा जास्तीच स्मार्ट असल्यामुळे त्यांना स्मार्ट पद्धतीनेच समजून सांगावं लागतं. म्हणून मग आता काय स्मार्ट ट्रिक वापरायची की ज्यामुळे प्रश्नही मिटून जाईल आणि राहुलला वाईट देखील वाटणार नाही....

असा विचार करत असताना बाबाच्या डोक्यात एक नामी कल्पना आली. जसं ख्रिसमस सणाला सॅन्टा येतो आणि गिफ्ट देतो तसंच काहीसं नाटक आत्ता करू ! इतकी वर्ष अमेरिकेत राहिल्यामुळे ते राहुलसाठी म्हणून ख्रिसमस साजरा करत होते. बाबा सॅन्टा बनून येणार आणि गिफ्ट ठेवणार हे नेहमीचं नाट्य ! तोच प्रकार आत्ता करू आणि आईला दंत परी करू.... ही कल्पना आईला देखील आवडली आणि उद्या रात्री दंत परी अवतरणार हे ठरलं.

ठरल्याप्रमाणे सगळी तयारी पटपट केली. राहुल आजही वाट बघत होता. वाट बघत असताना आईच्या रुपातील दंत परी बघून तो अतिशय खुश झाला आणि उरलेले दात दाखवून हसू लागला.... त्याला खूप आनंद झाला होता. गिफ्ट घेऊन तिला थँक यू म्हणून तो शहाण्या मुलासारखा झोपी गेला. खूप दिवसांनी आनंदाने, शांतपणे असं त्याला झोपलेलं बघून आई बाबा देखील सुखावले आणि तेही शांत झोपी गेले.

अशा प्रकारे ही दंत परीची दंत कथा! अखेरीस संपली. पण एका गोष्टीची ही घंटा वाजली होती की जेव्हा जेव्हा राहुलचा दात पडेल तेव्हा प्रत्येक वेळी आता ही दंत परी अवतरली पाहिजे.... सॅन्टा निदान वर्षातून एकदाच येतो. दंत परीला मात्र ही ड्युटी खूप वेळा करावी लागणार होती !!

*(ही कथा बालदिनाच्या निमित्ताने खास छोट्या वाचकांसाठी लिहिलेली आहे. अर्थात मोठे वाचक देखील हे वाचतीलच.)*

- **अंकिता कार्ले,** हार्टफर्ड, कनेटिकट

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## नकळत घडलेली परंपरा

आजच्या रात्रीच्या कार्यक्रमासाठी मी कागदाच्या नक्षीचे गोल बनवत होते. त्यामध्ये बॅटरीवरचे दिवे ठेवण्याचा बेत होता. तेवढ्यात 'अनुभव' माझ्या मैत्रिणीचा मुलगा भेटायला आला होता तो आला आणि कुतूहलाने मी करत असलेल्या हस्तकलेकडे बघत म्हणाला, मावशी काय करत आहेस? त्याच्याकडे हसतच बघत मी म्हणाले, अरे, आज संध्याकाळच्या कार्यक्रमासाठी बनवत आहे. त्यावर अनुभव म्हणतो कसा, मावशी मी आईकडून बरेच काही तुमच्या या कार्यक्रमाबद्दल ऐकले आहे. त्यामुळे माझे पण कुतुहल वाढले आहे. तर मला सांगणार का, काय गोष्ट आहे ह्या मागची?

हातातले काम बाजूला ठेऊन मी पण जणू काही गोष्ट सांगण्याच्या पावित्र्यात बसले. चार वर्षांपूर्वी आम्ही सगळे एका कौटुंबिक सहलीला गेलो होतो. तिथे ज्या हॉटेलमध्ये राहत होतो, तिथे बाजूला खूप झाडी होती आणि काही नैसर्गिक पायवाटा तर काही Man-Made trails होते. सगळे पुढे जाऊन समुद्र किनाऱ्याला मिळत होते. तसे Hotel च्या Rooftop वर दूरचा समुद्रकिनारा खुपच छान दिसत होता. आम्ही जेवढे दिवस Hotel मध्ये होते तेवढे दिवस अक्षरश: आम्ही सूर्योदय नाहीतर सूर्यास्त या Rooftop वरून पाहिला होता. त्या वास्तव्यात नवीन वर्षाच्या आगमनाच्या दिवशी

आम्ही अचानकच ठरवले की या नैसर्गिक पायवाटांमधून हिंडून नवीन वर्षाचे स्वागत समुद्र किनाऱ्यावर बसून आकाशातले तारांगण न्याहाळत साजरे करू. तसे थोडेफार सामान बरोबर घेऊन आम्ही साधारण संध्याकाळच्या सुमारास निघालो, वाटले की तसा अंधार असला तरी पायवाट असल्याने Torch च्या प्रकाशात जाऊ शकू. सुरवातीला खूपच उत्साह होता. त्यात Man-Made trail वरून Natural-Trail कडे कसे वळलो ते कळलेच नाही. अंधार पडायला लागला होता. वाटले की आता समुद्र किनारा दिसेल मग तारांच्या शांत प्रकाशात बसू, पण कसले काय, थोड्याच वेळात लक्षात आले की आम्ही पूर्णपणे रस्ता चुकलो आहेत. सगळीकडे नुसता अंधार दिसत होता. आता हळूहळू भिती वाटायला लागली होती. इतका अंधार आणि इतकी शांतता की आमच्याच श्वासांचे आवाज आम्हाला ऐकू येत होते. आता अजून पुढे जाण्यापेक्षा इथेच थांबून काय करता येईल ते पाहावे म्हणून थांबलो. Torch च्या प्रकाशात पाहिले तर तशी बरीच मोकळी जागा होती. अजून तासाभरातच नवीन वर्ष सुरू होणार होते. तसे बघितले तर आम्ही Hotel च्याच परीसरात होतो, अगदीच धोक्याचे वाटले असते तर फोन वरुन मदत मागवता येऊ शकणार होती पण विचाराअंती आम्ही ठरवले की इथेच थांबावे. पण मग काय करायचे, अंधारातच नवीन वर्ष कसे साजरे करायचे. तेव्हा प्रत्येकाच्याच डोक्यातून एक एक कल्पना निघत होती. चित्रा, कवी माझी मुले त्यांनी त्यांच्या bag pack मध्ये थोडे खाण्याचे सामान, आणि मजा म्हणजे मेणबत्त्या, छोटी चादर असे सगळे कधी भरले होते ते समजलेच नाही. मला वाटले होते की त्यांचे स्वतःचे सामान असेल पण शहाणपणाने बरेचसे आणले होते. माझ्या डोक्यात आम्ही निघाल्या पासून एक-दोन तासात परत येऊ तेव्हा विषेश काही बरोबर घ्यावे हे वाटले नव्हते.

अनुभव अगदी दंग होऊन ऐकत होता. मध्येच म्हणाला, काका कुठे होते. तेव्हा मी हसून म्हणाले की अरे आमच्याच बरोबर होते. मग पहिल्यांदा आम्ही मेणबत्त्या लावल्या, चारपाच मोठी दगडे होती ती जवळ आणली, त्याचा मोठा गोल तयार केला. त्यावर पण मेणबत्त्या लावल्या. त्या मिणमिणत्या प्रकाशामध्ये चक्कपैकी आम्ही खाली गवतावर चादर अंथरुन बसलो. त्या अंधुक प्रकाशात एकमेकांचे हात धरून शांतपणे आकाशाकडे पहात बसलो. निरभ्र आकाशात तारे शांतपणे चमकत होते. ते असे शांतपणे, आपल्याच लोकांच्या सहवासात तारांगण न्याहाळताना वेगळीच मजा आणि आनंद येत होता. खरं तर आम्हाला समुद्र किनाऱ्यावरच्या गार वाऱ्यात बसून तारांगण न्याहाळ्यायची होती पण तसे नाहीतर असे. खरं तर असा फक्त आमचा वेळ आम्ही कधीच घालवला नव्हता. हळूहळू बोलण्याचे रूपांतर छान मनमोकळ्या गप्पांमध्ये कसे झाले ते कळलेच नाही. पहिल्यांदाच आयुष्यात नवीन वर्षाची सुरवात छान गप्पांमध्ये झाली. रात्र जशी वाढली तशी थोडी थोडी थंडी जाणवू लागली होती. काय करावे, जावे का परत, करावा का मदतीसाठी फोन असे मला वाटत होते. पण मुलांना हे असे नवीन वर्षाचे स्वागत करणे हा खूपच थरारक अनुभव वाटत होता. मग काय इथेच रात्र घालवावी आणि सकाळी परत जावे असे ठरले.

हवेत गारवा दाटायला लागला होता आणि थंडीची जाणीव होऊ लागली होती. मग काय मफलर, ओढणी अंगाभोवती लपेटून आणि एकमेकांना बिलगून आम्हा सगळ्यांना कधी झोप लागली ते कळलेच नाही. सकाळी पाखरांच्या किलबिलाटात जाग आली. सकाळी उठून बघतो तर आम्ही पायवाटा सोडून बरेच आत आल्याची जाणीव झाली. कुतूहल म्हणून जरा पुढे जाऊन पाहिले तर मोकळ्या जागेनंतर परत थोडीफार झाडी होती. त्यातून बाहेर येऊन पाहतो तर समोर समुद्र किनारा. अगदी वेळेत आलो होतो. किनाऱ्यावरच उभे राहून नवीन वर्षाचा सूर्योदय पाहायला लागलो. आम्ही सगळ्यांनी एकमेकांचे हात हातात धरून समोरच्या उगवल्या सूर्याचे दृश्य डोळ्यात साठवत पाहिले. तेवढ्यात कवीला छान सेल्फीची कल्पना सुचली आणि उगवल्या सूर्याच्या पार्श्वभूमीवर आमचा नवीन वर्षाचा पहिला फोटो झाला.

मग मात्र Man Made Trail वरून Hotel वर परत आलो. दुसऱ्या वर्षी आम्हाला गतवर्षीची आठवण येऊन आम्ही परत तसेच वातावरण अंगणात तयार केले आणि मेणबत्तीच्या प्रकाशामध्ये, मात्र खात पित गप्पा मारत नवीन वर्षाची सुरवात साजरी केली. तिसऱ्या वर्षी विचार केला की तेच तेच करायच्या ऐवजी, आहे त्या कल्पनेमध्ये आपण अजून एक नवीन गोष्ट करू. मेणबत्तीऐवजी बांबूचे torch style दिवे लावू असे ठरले. म्हणून मग अंगणाच्या चारी बाजूने बांबूचे torch style दिवे लावले. आमच्या चौघांबरोबर अजून काही मित्र मैत्रिणिंना बोलावले. बांबूचा गोलाकर सोफा आणि मध्ये शेकोटी ग्रिल ठेवले. त्या वर्षी सगळ्यांना एकेक करून त्यांच्या वर्षभराच्या छान, मजेदार आठवणी सांगायला सांगितले. बोलता बोलता शेकोटी ग्रिलवर Marinate केलेल्या भाज्या, पनीर असे बरेच काही ताजे ताजे गरम गरम खात होतो. आमची अशी छान मजा कर्णोपकर्णी अजून काही मित्रमैत्रिणिंना कळाली तेव्हा पुढच्या वर्षी आम्ही पण येणार म्हणून त्यांनी जणू काही नंबरच लावून ठेवला होता. सगळे येणार म्हणून आम्हाला त्याला Commercial स्वरूप द्यायचे नव्हते. त्याच घरगुती नैसगिक वातावरणात आम्हाला नवीन वर्षाची सुरवात साजरी करायची होती. पण तोच तोच पणा नको म्हणून

दरवर्षी काहीतरी एक नवीन गोष्ट करावी असे आम्ही ठरवले. म्हणून मग चवथ्या वर्षी आम्ही सगळ्यांना त्या दिवसाच्या तारांगणाची माहिती घेऊन यायला सांगितले होते. परत त्याच सजावटीमध्ये बांबूचे दिवे बाजूला, त्यामध्ये बांबूचा गोलाकार सोफा आणि त्या मध्ये शेकोटी ग्रिल. चवथ्यावर्षी सगळ्यांनी सोफ्यावर आरामात बसून आकाशातल्या तारांगणांचे वर्णन आपापल्या परीने केले. लागोपाठ अशी ४ वर्ष नवीन वर्ष साजरे केले आणि नकळतच त्याची प्रथाच झाली. प्रत्येक जणांनाच पुढच्या वर्षी काय असेल याची उत्सुकता होती. तर या वर्षी मी म्हणाले कागदाच्या नक्षीकामाचे गोल करून त्यात Batteryचे छोटे दिवे आणि ते बांबू torchच्यावर ठेवू. यावर्षी मी ऐकले की बऱ्याच जणांनी गड, किल्ल्यांवर, आणि इतर ठिकाणी पण ट्रेकिंग केले आहे. तर स्वत:चे प्रवास वर्णन सांगायचे आहे. मग गोष्टी स्वरूपात सांगा किंवा चित्र काढून दाखवा किंवा Projector slideshow कसेही सादर करता येईल. पण मी सगळ्यांना गोष्टच सांगायला पाठिंबा देईन. अश्या गप्पा मारण्यातच मजा असते.

हे सगळे ऐकल्यावर अनुभव म्हणाला की मावशी म्हणजे ही आता तुमच्या कुटुंबाची एक प्रथाच झाली आहे पुढे जाऊन त्याचीच परंपरा होईल. मला खूप बरे वाटत आहे की याच दरम्यान मी तुम्हाला भेटायला आलो. पण घरात कोणीच अजून कोणीच कसे दिसत नाही. त्यावर मी म्हणाले, कवी, चित्रा संध्याकाळच्या कार्यक्रमासाठी काही खायचे पदार्थ आणायचे होते ते आणायला गेले आहेत. तुझे काका नहमी प्रमाणे study room मध्ये असतील. त्यांना तर काय ह्या सगळ्यांमुळे लिहायला विषयच विषय मिळाले आहेत.

शेवटी काय, जगण्यातल्या, आयुष्यातला निखळ, निर्भेळ आनंद आपणच शोधायचा असतो. तो कुठल्या मोठ्या घटना, गाजलेल्या क्षणांत नसतोच कधी, तो असतो त्या साध्या, सहज घडणाऱ्या क्षणांत, जिथं आपलेपणा असतो, हास्य असतं, आणि काळजीचं मोल असतं. एकमेकांबरोबर घालवलेले चार मजेचे क्षण, दिलखुलास आपलेपणाच्या गप्पा हीच खरी आपली संपत्ती असते.

हसू खेळू क्षण आनंदात घालवू
मैत्री भाव, आपलेपणा, नात्यांना जागवू
नवीन वर्षाचे उत्साहात,आनंदात स्वागत करू !

- **उत्तरा भालेराव,** टॅम्पा, फ्लोरिडा

## अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख

१६ ते २६ वयोगटातल्या उत्तर अमेरिकेतील युवांच्या अभ्यासाबाहेरील कौशल्यांवर प्रकाशझोत टाकण्याची आमची इच्छा आहे. या आगामी सदरात उत्तर अमेरिकेतील तरुणाईचे कला, खेळ, समाजसेवा, संगीत-नृत्य यांसारख्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य प्रकाशित करण्याचा प्रकल्प आम्ही सुरु करीत आहोत. या उपक्रमात युवक-युवतींची वैयक्तिक माहिती, त्यांची आवड, प्रेरणा, कामगिरी, उपलब्धी, सामाजिक प्रभाव आणि भविष्याची दिशा जाणून घेण्यासाठी एक संपूर्ण प्रश्नावली तयार केली आहे.

वय वर्षे १८ च्या वरील तरुणांनो व १८ हुन लहान असलेल्या मुलांच्या पालकांनो - तुम्हाला किंवा तुमच्या मुलांना ह्या प्रकल्पात सामील व्हायचे असेल तर खालील फॉर्म भरावा.

https://forms.gle/tf1ETWQQBQEfH9hT9

आमच्या आगाऊ पाठवलेल्या प्रश्नावलीच्या आधारावर घेतलेली तुमची मुलाखत वृत्तात प्रकाशित केली जाईल. इतरांना देखील प्रोत्साहन मिळेल!! हिवाळ्याच्या सुट्टीचा लाभ घेऊन त्वरित संपर्क साधा, आम्ही वाट बघतोय!!

## स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी....!

“आई”....शब्द अगदी छोटा आहे, पण प्रत्येक व्यक्तीचे भावविश्व व्यापून राहणारा..! ‘आई’, या शब्दातच वात्सल्याचा वास आहे. आयुष्यात इतर कितीही नाती असली तरी, आई सोबतचं नातं हे प्रत्येक मुलासाठी खूप खास असतं. हे नातं, निस्वार्थी भावनेच्या धाग्यात, माया आणि ममतेनं गुंफलेलं असतं...! जन्माला आल्यानंतर “आई” हा पहिला शब्द मुल उच्चारायला शिकतं; तेव्हा ‘आई’ त्याच्यासाठी फक्त एक शब्द असतो, पण तीच कधी मुलाच्या आयुष्याचा श्वास बनून जाते, ते कळत देखील नाही..!

बालवयात, तिचे बोट धरून मुलांना चालायला शिकवणारी; मुलांना छान छान गोष्टी सांगून त्यांच्यावर चांगले संस्कार करणारी आई हीच त्यांची पहिली शिक्षिका असते. बालपणातील मुलांचा खोडसाळपणा, त्यांचे रुसवे-फुगवे समजून घेणारी, आईच असते. मुलांना काही दुखलं-खुपलं, ती आजारी पडली, तर त्यांच्या उशाशी बसून, रात्र जागून काढणारी आई, स्वतःच्या तब्येतीकडे मात्र बरेचदा

दुर्लक्ष करते; कारण तिचा जीव तिच्या मुलांमधे आणि तिच्या मायेच्या माणसांमधे गुंतलेला असतो.

आईचा हात धरून मूल शाळेत जायला लागतं; तेव्हा शाळेतील त्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी, आई त्याला प्रोत्साहन देते, त्याचबरोबर मुलातील कलागुणांना वाव मिळावा यासाठी देखील ती झटत राहते. शालेय शिक्षणापासून ते महाविद्यालयात जाऊन पदवी संपादन करेपर्यंतच्या शैक्षणिक प्रवासात, आईची असणारी साथ खूप मोलाची ठरते. कित्येक प्रसंगी आई तिच्या मुलांसोबत मैत्रीपूर्ण संवाद साधून, त्यांच्या मनातील वैचारिक तसेच भावनिक द्वंद्व देखील अगदी सहजतेने दूर करते. आयुष्याच्या विविध टप्प्यांवर आईचे अस्तित्व तिच्या मुलांना एक सकारात्मक ऊर्जा देत असतं.!

शिक्षण संपल्यानंतर, मुले नोकरी-व्यवसायात व्यस्त होतात; तेव्हा देखील आई त्यांच्या आहाराची आणि तब्येतीची शक्य ती सर्व काळजी घेत राहते. तिच्या वयानुसार तिला होणारा त्रास, अधूनमधून येणारी आजारपणं, दुखणी, ह्या सगळ्याला सामोरं जात, आई तिच्या लेकरांसाठी स्वतःला वाहून घेते. मुलांना त्यांच्या आयुष्यात स्थिरावताना पाहून आईला मिळणारं समाधान तिच्या डोळ्यातून ओघळणाऱ्या आनंदाश्रूंनी अधोरेखित होत असतं. आईसाठी सगळ्यात भावूक क्षण येतो जेव्हा ती मुलांना त्यांचा संसार थाटताना बघते. मुलांचे सुखा-समाधानाने भरलेले संसार आईला त्या वयात तिने आजवर केलेल्या कष्टांचे चीज झाल्याची जणू साक्ष देत असतात..!

वर्षामागून वर्षे सरतात, आईच्या थकलेल्या शरीराला असतो तो तिच्या मुलांच्या प्रेमाचा आणि मायेच्या माणसांचा आधार..! आईच्या उतार वयात बरेचदा तब्येतीच्या कारणास्तव इच्छा असून देखील काही गोष्टी करणं तिला शक्य होत नाही; पण मुलांवर असणारे प्रेम तिला त्या वयातही स्वस्थ बसू देत नाही. जमेल तसं आणि जमेल तेवढं आई मुलांसाठी करत राहते; कारण, त्यातून मिळणारा आनंदच तिला वृद्धापकाळात जगण्याचं बळ देत असतो.

पण..आयुष्यात काही गोष्टी आपल्या हातात नसतात. आपल्याला कितीही इच्छा असली तरी काही गोष्टी घडण्यापासून आपण त्यांना थांबवू शकत नाही. आईच्या मायेची ऊब आयुष्यभर आपल्या सोबत असावी असं कितीही वाटलं तरी प्रत्येक मुलाला त्या दिवसाला सामोरं जावं लागतं जेव्हा आईच्या निरपेक्ष प्रेमाला ते कायमचं दुरावतं. आपली आई आता या जगात नाही हे सत्य स्वीकारणं हा प्रत्येक अपत्यासाठी अत्यंत दुःखद क्षण असतो; कारण, ‘आई’ हे फक्त एक नातं नसतं तर ती मुलांचे सर्वस्व असते!

“काळ हे सगळ्या दुःखांवरचं औषध आहे”, असं म्हंटलं जाते; पण आईच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढणं, हे काळासाठी देखील सोपं नसाव.! कितीही वर्षे लोटली तरी आईच्या जाण्याचं दुःख तिच्या मुलांच्या मनात कायम राहतं आणि राहील; मात्र, आईच्या सदिच्छा आणि आशीर्वाद यांची शिदोरी आयुष्यभर तिच्या मुलांसोबत राहून त्यांच्या आयुष्याला सावरत राहील,आणि प्रत्येक नात्यातील निस्वार्थी प्रेमभावना जपण्यासाठी, त्यांना प्रेरणा देत राहील...!

- **शुभदा जोशी-पारखी**, कोलंबिया, मेरीलँड

## ओ'हेर एका वैमानिकाची वीरगाथा

जगातील सर्वात व्यस्त विमानतळांपैकी एक म्हणजे शिकागोचे ओ'हेर विमानतळ . दररोज लाखो पावले तिथे पडतात, हजारो सूटकेसेस घरघरतात आणि असंख्य प्रवासी आपापल्या प्रवासाला निघतात, ये-जा करतात. पण त्या धावपळीत, आपण कधी विचार केला आहे का की 'ओ'हेर' (O'Hare) हे नाव आले कोठून? हे नाव कोणत्या राजकारण्याचे, उद्योजकाचे किंवा शहराच्या संस्थापकाचे नाही.

हे नाव आहे एका अशा वीराचे, ज्याने आकाशात एका अशक्य लढाईत आपले सर्वस्व पणाला लावले होते. ही कहाणी आहे लेफ्टनंट कमांडर एडवर्ड "बुच" ओ'हेर यांची. कोण होते हे ओ'हेर ? हे कळण्यासाठी आपल्याला इतिहासात थोडं मागे जावं लागेल

**७ डिसेंबर १९४१ :** हा दिवस इतिहासाच्या पानांवर रक्ताने आणि आगीने लिहिला गेला. त्या दिवशी सकाळी, हवाई बेटांवरील ‘पर्ल हार्बर’च्या शांत पाण्यावर, जपानी बॉम्बर विमानांनी नरसंहार मांडला. अमेरिकन नौदलाचा अभिमान - त्यांची बलाढ्य जहाजे, काही क्षणांत जळून खाक होत होती. पण त्या आगीच्या ज्वाळांपासून हजारो मैल दूर, कॅलिफोर्नियाच्या सॅन दिएगो (San Diego) बंदरात, एक तरुण, धाडसी पायलट, लेफ्टनंट एडवर्ड ‘बुच’ ओ'हेर, यूएसएस साराटोगा (USS Saratoga) या विमानवाहू नौकेवर, फायटर स्क्वाड्रन ३ (VF-3) मध्ये तैनात होते. 'साराटोगा' हे एक बलाढ्य जहाज होते, पण त्या दिवशी ते युद्धासाठी सज्ज नव्हते, किंबहुना,

जहाजाची नुकतीच एक मोठी दुरुस्ती (overhaul) पूर्ण झाली होती आणि ते सॅन दिएगोच्या धक्क्यावर शांतपणे उभे होते.
तो रविवार होता आणि अचानक ती बातमी आली.

रेडिओवरून, टेलिग्राफवरून, ती विनाशकारी बातमी वाऱ्यासारखी पसरली: "पर्ल हार्बरवर हल्ला झाला आहे!" एका क्षणात सारे चित्र पालटले. सॅन दिएगोच्या बंदरातील शांतता भंग पावली. 'साराटोगा' आता दुरुस्तीतून बाहेर आलेले जहाज राहिले नव्हते. लढाई दारावर येऊन थडकली होती. जहाजावर एकच धांदल उडाली - इंधन भरा, शस्त्रे सज्ज करा, युद्धासाठी तयार व्हा!

दुसऱ्याच दिवशी, ८ डिसेंबरला, 'साराटोगा'ने सॅन दिएगो बंदर सोडले. तिने आपला मोर्चा थेट हवाईच्या दिशेने वळवला. सुमारे एका आठवड्यानंतर साराटोगा पर्ल हार्बरला पोहोचली

परंतु पॅसिफिक मध्ये त्यावेळी आगडोंब उसळला होता. 'वेक आयलंड' नावाचा अमेरिकेचा आणखी एक छोटा तळ जपान्यांच्या भयंकर हल्ल्याखाली होता. 'साराटोगा'ला (ओ'हेर यांच्यासह) लगेचच त्या बेटावर वेढा पडलेल्या मरिन्सना वाचवण्यासाठी पाठवण्यात आले.

पण खूप उशीर झाला होता. ओ'हेर आणि त्यांची नौका तिथे पोहोचण्यापूर्वीच, २३ डिसेंबरला 'वेक आयलंड'ने जपानसमोर शरणागती पत्करली. ओ'हेर आणि त्यांच्या साथीदारांना रिकाम्या हाती हवाईला परतावे लागले.

**११ जानेवारी १९४२ :** हवाईला परतल्यानंतर, 'साराटोगा'ला पुन्हा गस्तीवर पाठवण्यात आले. ११ जानेवारी १९४२ रोजी, हवाईच्या दक्षिणेला समुद्रात गस्त घालत असताना, एक मोठा घात झाला. एका जपानी पाणबुडीने सोडलेला एक शक्तिशाली टॉर्पेडो थेट 'साराटोगा'वर आदळला. तो स्फोट इतका भयंकर होता की, जहाजाच्या तीन इंजिन रूम्समध्ये पाणी भरले. 'साराटोगा' बुडता-बुडता वाचली. आणि कशीबशी पर्ल हार्बरला परतली. पण तिचं प्रचंड नुकसान झालं होतं. तिला युद्धांतून बाहेर पडावे लागले. दुरुस्तीसाठी तिला अमेरिकेला परत पाठवण्यात आले. त्यावेळी दक्षिण पॅसिफिकमध्ये अमेरिकेकडे केवळ एकच दुसरी विमानवाहू नौका कार्यरत होती: 'यूएसएस लेक्सिंग्टन' (USS Lexington). बुच ओ'हेर आणि त्यांच्या संपूर्ण फायटर स्क्वाड्रनला (VF-3) तात्काळ 'साराटोगा'वरून 'लेक्सिंग्टन'वर बदली करण्यात आले.

**२० फेब्रुवारी १९४२:** दक्षिण पॅसिफिकच्या अथांग समुद्रावर अमेरिकन विमानवाहू नौका 'यूएसएस लेक्सिंग्टन' (USS Lexington) गस्त घालत होती. अचानक, रडारवर एक धोक्याची सूचना झळकली. नऊ जपानी ‘बेटी’ बॉम्बर विमानांचा एक गट, सरळ 'लेक्सिंग्टन'च्या दिशेने झेपावत होता. ही विमाने साधीसुधी नव्हती; ती 'कॅरियर-किलर' (Carrier-killer) म्हणून ओळखली जात होती. त्यांचा एकच निशाणा होता - 'लेक्सिंग्टन'ला जलसमाधी देणे.

जपान्यांच्या पहिल्या बॉम्बर विमानांशी लढण्यासाठी लेक्सिंग्टनवरून सहा विमाने अगोदरच उडाली होती आणि त्या क्षणी, त्या त्याच्या दुसऱ्या नऊ बॉम्बर विमानांच्या गटाला रोखण्यासाठी फक्त दोनच अमेरिकन लढाऊ विमाने लेक्सिंग्टन वर तैनात होती. एक बुच ओ'हेर यांचे, आणि दुसरे त्यांच्या सहकाऱ्याचे दोन्ही विमाने हवेत झेपावली खरी पण ओ'हेर यांच्या सहकाऱ्याच्या विमानाच्या बंदुका ऐनवेळी निकामी झाल्या!

आता चित्र स्पष्ट होते. एका बाजूला नऊ जपानी बॉम्बर आणि दुसऱ्या बाजूला एकटा अमेरिकन पायलट, बुच ओ'हेर. त्यांच्या जागी दुसरा कोणी असता, तर त्याने कदाचित माघार घेतली असती. नऊ विमानांशी एकट्याने लढणे म्हणजे आत्महत्येसारखेच होते. पण बुच ओ'हेर यांनी एका क्षणात निर्णय घेतला. आपल्या विमानवाहू नौकेला वाचवण्यासाठी त्यांनी आपले विमान थेट त्या नऊ विमानांच्या थव्याच्या दिशेने झेपावले. आणि पुढची काही मिनिटे इतिहासात नोंदवली गेली. ओ'हेर यांनी एकाकी झुंज सुरू केली. ते विजेच्या चपळाईने एका विमानातून दुसऱ्या विमानावर झडप घालत होते. त्यांच्या बंदुकांमधून गोळ्यांचा वर्षाव होत होता. शत्रूची विमाने इतक्या जवळ होती की, जपानी पायलटांचे चेहरेही स्पष्ट दिसत होते. गोळ्यांची एक सर ओ'हेर यांच्या विमानाच्या अगदी जवळून गेली, पण ते डगमगले नाहीत.

अवघ्या चार मिनिटांत, बुच ओ'हेर यांनी अशक्य ते शक्य करून दाखवले. त्यांनी एकट्याने पाच जपानी बॉम्बर विमाने आकाशातच नष्ट केली आणि सहाव्या विमानाचे इतके नुकसान केले की ते निकामी झाले. उरलेल्या विमानांनी आपला जीव वाचवण्यासाठी पळ काढावा लागला.

जेव्हा ओ'हेर 'लेक्सिंग्टन'वर परतले, तेव्हा त्यांच्या विमानात इंधन आणि गोळ्या... दोन्ही संपत आले होते. पण त्यांनी अशक्य कामगिरी बजावली होती. पर्ल हार्बरच्या हल्ल्याची जखम ताजी असतानाच, एका ओ'हेर नावाच्या तरूण वैमानिकाने, संपूर्ण विमानवाहू नौकेला प्रचंड विनाशापासून वाचवले होते.

या अतुलनीय शौर्याने बुच ओ'हेर यांना रातोरात अमेरिकेचा ‘real hero’ बनवले. ते दुसऱ्या महायुद्धातील अमेरिकन नौदलाचे पहिले 'फायटर एस' (Fighter Ace) बनले. राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनी स्वतः त्यांना अमेरिकेचा सर्वोच्च लष्करी सन्मान 'मेडल ऑफ ऑनर' (Medal of Honor) प्रदान केला.

**नियतीचे फासे :** ओ'हेर यांनी रिटा वूस्टर (Rita Wooster) शी लग्न केले आणि १९४३ मध्ये त्यांना एक मुलगी झाली, कॅथलीन (Kathleen). एका बाजूला हे कौटुंबिक सुख होते, ‘मेडल ऑफ ऑनर' (Medal of Honor) हा सर्वोच्च लष्करी सन्मान होता पण नियतीला काही वेगळेच मंजूर होते. त्यांनी आपल्या मुलीला जेमतेम पाहिले असेल, नसेल, पण त्यांना लगेच परत युध्दावर परतावे लागले.

आता जपान्यांनी त्यांच्या युध्दाच्या तंत्रात बदल करून रात्रीचे हल्ले सुरू केले होते. अमेरिकेकडून हे हल्ले रोखण्याची मोहीम सुरू झाली आणि जपान्यांविरूध्द कारवाई करण्यासाठी बुच ओ'हेर निवडले गेले. परंतु दुर्दैवाने २६ नोव्हेंबर १९४३ च्या रात्री, गिल्बर्ट बेटांवर नौदलाच्या अशाच एका रात्रीच्या लढाऊ मोहिमेदरम्यान ते कारवाईत ठार झाले.

**ऑर्चर्ड फील्ड ते ओ'हेर :** शिकागोचे हे एक जागतिक दर्जाचे विमानतळ बनण्यापूर्वी, बरेच वर्ष आधी ही जागा डग्लस सी-५४ (Douglas C-54) या लष्करी वाहतूक विमानांच्या निर्मितीचा कारखाना होती. ही जागा काही काळासाठी 'ऑर्चर्ड फील्ड एअरपोर्ट' (Orchard Field Airport) म्हणून ओळखली जात होती, आणि म्हणूनच या विमानतळाचा IATA कोड आजही ORD आहे.

१९४९ मध्ये, 'शिकागो ट्रिब्यून'चे प्रकाशक कर्नल रॉबर्ट आर. मॅककॉर्मिक यांनी या विमानतळाचे नाव बदलून एका युद्ध नायकाच्या सन्मानार्थ ठेवण्यासाठी मोहीम सुरू केली. बुच ओ'हेर यांच्या अतुलनीय शौर्यामुळे त्यांची निवड करण्यात आली. शिकागो सिटी कौन्सिलने १७ सप्टेंबर १९४९ रोजी अधिकृतपणे या विमानतळाचे नाव 'शिकागो ओ'हेर आंतरराष्ट्रीय विमानतळ' (Chicago O'Hare International Airport) असे ठेवले.

आज, त्यांचा वारसा केवळ नावातच नाही, तर विमानतळाच्या आतही जपला गेला आहे. ओ'हेर यांनी आपल्या लेक्सिंग्टन मोहिमेदरम्यान उडवलेल्या ग्रुमन एफ४एफ-३ वाइल्डकॅट' (Grumman F4F-3 Wildcat) या विमानाची एक (restored) प्रतिकृती टर्मिनल २ मध्ये प्रदर्शनासाठी ठेवली आहे.

हे विमान आधी बरेच वर्षे विमानतळाच्या मुख्य पार्किंग गॅरेज जवळ बाहेरच्या बाजूला होते. १९९७ मध्ये, या विमानाचे नूतनीकरण करण्यात आले आणि त्याला हवामानातील बदलांपासून वाचवण्यासाठी टर्मिनल २ च्या आत, त्याच्या सध्याच्या जागी हलवण्यात आले. त्यामुळे, पुढच्या वेळी जेव्हा तुम्ही शिकागो विमानतळावर असाल, तेव्हा टर्मिनल २ मध्ये ठेवलेल्या त्या जुन्या 'वाइल्डकॅट' विमानाकडे नक्की पाहा. ते विमान म्हणजे बुच ओ'हेर यांच्या त्या एकाकी लढाईची आणि अतुलनीय धैर्याची मूक साक्ष आहे. ते आपल्याला आठवण करून देते की, त्या गजबजलेल्या विमानतळाचे नाव एका अशा नायकाच्या नावावर आहे, ज्याने कधीकाळी आपल्या अतुलनीय अशा शौर्याने आकाशात इतिहास घडवला होता.

\- **शैलेश पोतदार,** कॉपेल, टेक्सस

## हेचि दान देगा देवा

महाराष्ट्राच्या जडणघडणीत १३व्या शतकापासून १७व्या शतकापर्यंत, म्हणजेच संत ज्ञानेश्वरांपासून (१२७५ - १२९६) ते संत तुकारामांपर्यंत (१६०८ - १६५०) जवळपास ४०० वर्षे वारकरी संप्रदायातील संतांच्या सहवासाचा व त्यांनी निर्मिलेल्या साहित्याचा मोलाचा वाटा आहे असं आपण सदोदित म्हणतो. परंतु, त्यांचं योगदान हे केवळ आषाढी एकादशी किंवा दिवाळी पहाट सारख्या कार्यक्रमांतून सादर करायच्या अभंगांपुरते, गणपतीत म्हणायच्या आरत्यांपुरते वा समाजमाध्यमांवर मिरवायच्या वारीच्या फोटोंपुरते आक्रसून जात आहे अशी परिस्थिती सध्या बघायला मिळते आहे. म्हणूनच राजकीय, सामाजिक, आध्यात्मिक व तात्त्विक पातळ्यांवरच्या त्यांच्या कार्याचं पुनरावलोकन करायचा हा अल्पसा प्रयत्न.

छत्रपती शिवाजी महाराजांना हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यासाठी महाराष्ट्रातील अठरापगड जातीजमातींच्या लोकांचं बहुमोल सहकार्य लाभलं हे आपल्याला माहित आहे. न्यायमूर्ती रानडे ह्यांनी "मराठी सत्तेचा उत्कर्ष" ह्या पुस्तकात नमूद केल्याप्रमाणे हे स्वराज्य हा केवळ योगायोग नव्हता तर त्याआधी ३००-३५० वर्षे संतांनी केलेल्या मशागतीमुळे मिळालेलं ते फळ होतं. विविध जातींत विखुरलेल्या, पिचलेल्या समाजाची शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीत मिळालेली साथ ही एक अभूतपूर्व घटना सबंध भारतात केवळ महाराष्ट्रात घडली. आज विविध संतांना जातीजातीत वाटून त्या गौरवशाली इतिहासाकडे आपण पाठ फिरवली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी, स्वराज्यासाठी आपापसातला बंधुभाव जोपासत संतांनी दाखवलेल्या समतेच्या मार्गावर एकत्र आलेला समाज आपण अनुभवला आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही फ्रेंच राज्यक्रांतीने

(१७८९ - १७९९) जगाला दिलेली देणगी आहे असं आपण मानतो. मग १७व्या शतकात स्थापन झालेलं हिंदवी स्वराज्य हे काय होतं? फ्रेंच राज्यक्रांतीच्या १०० वर्षे आधीच महाराष्ट्राने हे जगाला करून दाखवलं आहे. महाराष्ट्राला शिवाजी महाराजांच्या रूपाने "जाणता राजा" लाभला आणि संतांची ही मांदियाळी लुप्त झालेली आपल्याला दिसून येते. संत बहिणाबाईंनी म्हटलंच आहे — "ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस". ह्या देवालय-रूपकाचा विस्तार संत नामदेवांनी केला तर त्याला खांबरुपी आधार द्यायचं काम संत एकनाथांनी केलं.

संत ज्ञानेश्वरांनी १२९० मध्ये "भावार्थदीपिका" हा भगवद्‌गीतेवर भाष्य करणारा ग्रंथ रचला. संस्कृत भाषेतील हा मोलाचा ग्रंथ त्यांनी सामान्यांच्या भाषेत उपलब्ध करून दिला एवढंच ह्याचं महत्त्व नाही. ज्या भाषेत तत्त्वज्ञानविषयक लिखाण होतं ती उच्च दर्जाची समजली जाते. त्या दृष्टीने मराठी भाषेचं सामर्थ्य त्यांनी जगापुढे सिद्ध केलं व संस्कृतचं पारंपारिक वर्चस्व झुगारून दिलं. ही खूप अलौकिक घटना आहे. आज आपण संभ्रमात पडलो आहोत की आधुनिक ज्ञानशाखांमधील व्यवहार पेलण्यास मराठी सक्षम आहे का. सर्व संतांनी त्याचं सप्रमाण व निर्विवाद उत्तर कितीतरी शतकांपूर्वीच दिलं आहे. (चक्रधरस्वामी, मुकुंदराज व निरनिराळ्या जैन साधूंनीही महाराष्ट्री प्राकृत व मराठीत तोलामोलाची ग्रंथनिर्मिती केली आहे.) ज्ञानेश्वरी ही केवळ एक भाषिक क्रांती नव्हती. त्यायोगे ज्ञानेश्वरांनी वेदांपेक्षा जास्त प्रामाण्यदर्जा गीतेला दिला. ते म्हणतात — हा वेदार्थ सागरु । जया निद्रिताचा घोरु । तो स्वये श्री सर्वेश्वरु । प्रत्यक्ष अनुवादिला ।। वेद हे जर निद्रेत असलेल्या भगवंताच्या घोरण्याचा आवाज असेल तर त्याने जागेपणी सांगितलेली गीता श्रेष्ठ नाही का? तसंच, वैदिक जगतात उपनिषदे, ब्रह्मसूत्रे आणि गीता ह्यांना प्रस्थानत्रयी मानतात. पण ज्ञानेश्वरांनी अन्य २ प्रस्थानांवर भाष्य करायची प्रथा मोडली. राजारामशास्त्री भागवतांनी म्हटलं आहे — "आम्हा मराठ्यांस श्रुती, स्मृती, वेदांतभाष्याची गरज नाही. ज्ञानेश्वरी व तुकारामबुवांची गाथा म्हणजे आमचे आगम."

संत नामदेवांनी (१२७० - १३५०) संत ज्ञानेश्वरांच्या भक्ती परंपरेचा विस्तार थेट पंजाबपर्यंत केला. त्यांना ज्ञानेश्वरांविषयी नितांत आदर होता. ते म्हणतात — "नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी।। त्यांच्या कीर्तनांमधील माधुर्य अवर्णनीय होतं. नामदेवांचा प्रभाव पंजाबी लोकांवरही पडला. म्हणूनच शिखांच्या पवित्र ग्रंथात — गुरु ग्रंथसाहिबमध्ये — त्यांच्या ६१ अभंगांचा समावेश आहे. महाराष्ट्र आणि पंजाबला आध्यात्मिक दृष्ट्या जोडण्याचं काम दुसऱ्या कोणीच केलेलं नाही.

संत एकनाथ (१५३३ - १५९९) हे वारकरी संप्रदायातील तिसरे वैशिष्ठपूर्ण संत. त्यांनी जनजागृतीसाठी "भारुड" ह्या सर्वार्थाने मराठी काव्य-नाट्य आविष्काराची निर्मिती केली. ज्ञानेश्वरांच्या समाधीच्या जीर्णोद्धाराचं महत्त्वाचं काम त्यांनी केलं. तसंच, काळाच्या ओघात ज्ञानेश्वरीत प्रक्षिप्त झालेल्या ओव्या वगळून तिच्या शुद्धीकरणाचं कामही त्यांनी केलं. भागवतातील एकादश स्कंधावर त्यांनी मराठीत भाष्य केलं जे एकनाथी भागवत म्हणून सुपरिचित आहे. खरंतर ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकारामांची गाथा हीच वारकऱ्यांची प्रस्थानत्रयी म्हटली पाहिजे. एकनाथांनीही मराठीचा प्रकर्षानं आग्रह धरला. "संस्कृत वाणी देवे केली तरी प्राकृत काय चोरापासोनि जाली?" हे त्यांचे उद्गार मराठी भाषेची महती विशद करतात.

ह्या सर्व पूर्वसुरींना शिरोधार्य मानूनही, आपण सर्व आभाळभर होऊनही कवेत न येणाऱ्या संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकारामांची थोरवी शब्दांत वर्णन करता येणं अशक्यप्राय आहे. तत्त्वज्ञानाच्या बाबतीतल्या त्यांच्या अभंगांचा परीघ कोणत्याही पाश्चात्य तत्त्ववेत्याला सहज मागे टाकेल एवढा आहे. न्यायमूर्ती रानड्यांचा "जे का रंजले गांजले" हा सर्वात आवडता अभंग होता. ह्याच अभंगात शाहू छत्रपतींना प्रजाहितकेंद्रित राज्यव्यवस्थेचा मंत्र सापडला. बहिणाबाई तर तुकारामांच्या अभंगांना "तुकारामवेद" असंच संबोधतात. तुकोबांचं मात्र वेदांविषयी स्पष्ट मत होतं — गोब्राह्मणहिता होऊनि निराळं । वेदांचे ते मूळ तुका म्हणे ।। भक्तीशिवाय ब्रह्मज्ञानास काहीच अर्थ नाही यावर ते ठाम होते. तुकोबांनी गुरु-शिष्य परंपरेला वैचारिक कलाटणी दिलेली दिसून येते — मेघवृष्टीने करावा उपदेश । परि गुरुने न करावा शिष्य ।। भगवंत जर सर्व चराचरात सामावलेला आहे तर कोण गुरु आणि कोण शिष्य? भगवंतालाच आपण सर्वोच्च गुरु मानलं पाहिजे. तुकारामांनी स्वर्गप्राप्तीच्या संकल्पनेवरच हल्ला चढवला — स्वर्गींचे अमर इच्छिताती देवा । मृत्युलोकी व्हावा जन्म आम्हा ।। ते स्वर्गसाधक यज्ञाचा उपहास करून वैकुंठ ही कल्पना स्थापित करतात. त्यापुढेही जाऊन वैकुंठच भूमीवर पंढरीत आहे असं म्हणतात — तुका म्हणे सोपी केली पायवाट । पंढरी वैकुंठ भूमिवरी ।।

तुकारामांनी केवळ धार्मिक कर्मकांडांवर हल्ला चढवला असं नाही तर त्यांनी त्यांच्या अभंगांतून व्यापार, सावकारी, शेतकी ह्या विषयांनाही हात घातला आहे. शिवाजी महाराजांसाठी लढणाऱ्या पाईकांवर (सैनिकांवर) अभंग लिहिले आहेत — पाइकीचे सुख पाइकासी ठावे । म्हणोनिया जिवे केली साटी ।।

अशा ह्या तुकोबांची भुरळ महात्मा फुले, आंबेडकर, भांडारकर ह्यांनाच पडली असं नाही तर मुंबई विद्यापीठाचे पहिले

कुलगुरू अलेक्झांडर ग्रँट ह्यांनीही त्यांची महती ओळखली होती. आज आपणही मराठी भाषेत अगदी सहज म्हणून ज्या ओळी उद्धृत करतो — वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे, तुज आहे तुजपाशी, आनंदाचे डोही आनंद तरंग, आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने — ह्या आणि इतरही बऱ्याच हे सर्व तुकोबांचेच देणे आहे. तुकाराम हा विषयच इतका व्यापक आहे की "तुकाराम दर्शन" हे भारतीय तत्त्वज्ञानातील एक स्वतंत्र दर्शन ठरावे. दिलीप चित्रे यांनी तुकोबांच्या अभंगांचे इंग्रजीत भाषांतर करून त्यांना जागतिक पटलावर नेलं. त्यायोगे मराठी संस्कृतीमधील स्थित्यंतराची व सामर्थ्याची सर्व जगाला ओळख झाली. तुकाराम हे सर्वसमावेशक विद्रोही संत होते. पण चिकित्सेला घाबरणारे नव्हते. त्यांनीच म्हटलं आहे — झाले दर्पणाचे अंग । ज्याचा त्यासी दावी रंग ।। महात्मा फुले यांसारख्या सामाजिक क्रांतिकारकाने तुकोबांना "शेतकऱ्यांचा संत" म्हणून संबोधलं. लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्यात तुकारामांच्या सर्वाधिक वचनांचा उल्लेख आढळतो. वेगवेगळ्या विचारसरणीच्या विचारवंतांना तुकोबांच्यात नक्कीच काहीतरी सापडलं. म्हणूनच तुकोबा हे महाराष्ट्राच्या अस्मितेचा मानबिंदू ठरले, महाराष्ट्राची निजखूण ठरले. ते ज्ञानोबांपासून आजच्या आधुनिक महाराष्ट्रापर्यंत दुवा बनून राहिले आणि खऱ्या अर्थाने सार्वकालिक संत ठरले.

हे सर्वच संत विचारांनी आणि कृतीने वैश्विक आहेत. तुकोबांनीच म्हटलं आहे — झाली माझी वैखरी । विश्वभरी व्यापक ।। ह्या अखिल विश्वाच्या कल्याणासाठी ज्ञानोबांनीच "पसायदानाद्वारे" भगवंताकडे आळवणीही केली आहे. प्रश्न एवढाच आहे की संतांनी दिलेलं हे संचित आपण खरा "महाराष्ट्र धर्म" जोपासण्यासाठी वापरणार का? ती सद्बुद्धी मिळावी म्हणूनच आपल्या सर्वांसाठी मी एवढंच मागेन — हेचि दान देवा देगा । संतांचा विसर न व्हावा ।।

- **अमित भावे**, गार्डन ग्रोव्ह, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## मराठवाडा पूरग्रस्त मदतनिधी अहवाल

सप्टेंबर २०२५ मध्ये मराठवाड्यात भीषण पूरस्थिती उद्भवली, ज्यामुळे जीवितहानीसह खूपच मोठी वित्तहानी झाली. याचा मोठा फटका मराठवाड्यातील शेतकऱ्यांना बसला.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या "समाजरंग" या उपक्रमांतर्गत, उत्तर अमेरिकेतील मराठी समाज आपल्या संकटग्रस्त बांधवांच्या पाठीशी उभा आहे हे दाखवण्यासाठी आम्ही हा मदतनिधी उपक्रम सुरु केला.

आम्ही सर्व मंडळांच्या अध्यक्षांना आवाहन केले की त्यांनी आपापल्या मंडळांत "मराठवाडा पूरग्रस्त मदतनिधी" आयोजित करावे. त्याचबरोबर आम्ही खालील संस्थांशीही संवाद साधला: ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन, महाराष्ट्र फाउंडेशन, सेवा इंटरनॅशनल, सेव्ह इंडियन फार्मर्स. या सर्व संस्थांनी पूरग्रस्त भागात मदत उपक्रम सुरू केले असून, बृहन्महाराष्ट्र मंडळाला सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे. आम्ही निधीसंकलनाच्या सुरुवातीलाच बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे "मुख्यमंत्री सहायता निधी" ला ₹१ लाखाची देणगी जाहीर केलेली.

आम्ही $२५,००० चे लक्ष्य ठरविले होते, आणि आनंदाची गोष्ट म्हणजे आपल्या सर्वांच्या प्रेमळ आणि निःस्वार्थ योगदानातून $३२,००० पेक्षा जास्त निधी जमा झाला आहे! ही रक्कम वर उल्लेख केलेल्या संस्थांना पूरग्रस्तांच्या मदतीसाठी देण्यात येणार आहे.

मंडळानुसार देणग्यांचा तपशील:

- मराठी विश्व (न्यू जर्सी) — $४,०००
- युटा — $२,६५४
- पिट्सबर्ग — $२,३०५
- फिलाडेल्फिया — $१,५००
- सिॲटल् — $१,२००
- कोलोराडो — $१,१००
- डॅलस फोर्ट वर्थ — $१,००१
- साऊथ फ्लोरिडा — $१,०००
- न्यू इंग्लंड — $१,०००
- त्रिवेणी (सिनसिनाटी) — $१,०००
- सेंट्रल पेनसिल्व्हेनिया — $९००
- मिल्वॉकी — $५०१
- बे एरिया — $५००
- लास वेगास — $३००
- सेंट्रल व्हॅली कॅलिफोर्निया — $२५०

(उरलेली रक्कम वैयक्तिक देणग्यांमधून जमली)

मी या सर्व मंडळांच्या अध्यक्षांचे, बृहन्महाराष्ट्र मंडळ प्रतिनिधींचे, तसेच सर्व देणगीदारांचे मनापासून आभार मानतो.

ही रक्कम कशा प्रकारे वापरली गेली याचा सविस्तर अहवाल पुढील महिन्यात सादर करण्यात येईल. आपल्या सातत्यपूर्ण सहकार्याबद्दल पुन्हा एकदा मनःपूर्वक धन्यवाद!

**-प्रसाद पानवळकर, अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ**

## फिलाडेल्फिया मराठी मंडळ (पीएमएम): सामाजिक आणि सांस्कृतिक बांधिलकीचा आदर्श

'पीएमएम' अध्यक्षा सौ. सुचित्रा शिंदे यांचा कार्यप्रवास, अनुभव आणि भविष्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन जाणून घेण्यासाठी साधलेला खास संवाद:

नमस्कार सुचित्रा,

**प्रश्न:** आज आम्हाला वेळ दिल्याबद्दल तुमचे खूप खूप आभार. सर्वात प्रथम तुम्ही आमच्या वाचकांना स्वतः बद्दल काही सांगू इच्छिता का? थोडक्यात, तुम्ही पहिल्यांदा 'फिलाडेल्फिया मराठी मंडळ' - 'पीएमएम'शी कधी आणि कशा जोडल्या गेलात? यावेळच्या काही विशेष आठवणी आहेत का?

**सुचित्रा ताई:** नमस्कार, या संधीसाठी मी बृ. म मं चे अध्यक्ष श्री. प्रसाद पानवळकर आणि 'बृ. म मं वृत्त' यांचे आभार मानू इच्छिते. व्यवसायाने मी एक संगणक अभियंता असून आरोग्यसेवेत माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापक ('आयटी मॅनेजर') म्हणून कार्यरत आहे. २००१ मध्ये मी वॉशिंग्टन डी. सी. ला आले. सुरुवातीला मी अनेक भारतीयांसोबत राहत असल्याने, मला कोणत्याही मराठी मंडळात सामील होण्याची गरज वाटली नाही. माझ्या मुलीचा जन्म २००५ मध्ये झाला आणि ती मोठी होत असताना मात्र मला मराठी आणि भारतीय संस्कृतीशी अधिक जोडण्याची गरज वाटली. मी पहिल्यांदा २०१० मध्ये कार्यकारी समिती सदस्य म्हणून मंडळात सामील झाले आणि त्यांच्या पारंपरिक कार्यक्रमांमध्ये तसेच वार्षिक सदस्यत्वाच्या कामात मदत केली. कोविड महामारीच्या दरम्यान, मंडळ सदस्यत्वात लक्षणीय घट झाली होती. या काळात मी मंडळात अधिक सक्रियपणे सहभागी झाले. २०२३ मध्ये, मी मंडळाच्या उपाध्यक्षा म्हणून काम केले आणि सध्या मंडळाची अध्यक्षा आहे. आज मंडळाची सदस्य संख्या २६० वर पोहोचली आहे. मंडळाच्या सर्व उपक्रमांमध्ये तसेच मंडळाची सदस्य संख्या वाढवण्यात माझ्यासोबत श्री. सचिन प्रभुदेसाई यांचा देखील मोलाचा वाटा आहे, त्याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे. मी आमच्या कार्यकारी समितीचे देखील आभार मानू इच्छिते.

**प्रश्न:** थोडे पीएमएम मंडळाबद्दल - ते कधी स्थापन झाले आणि सध्या मंडळातर्फे कोणते कार्यक्रम सादर होतात?

**सुचित्रा ताई:** 'पीएमएम' हे उत्तर अमेरिकेतील दुसरे सर्वात जुने मराठी मंडळ आहे. १९७१ मध्ये श्री. विनय कसबेकर यांनी त्यांच्या घरी एक लहानसा मेळावा भरवून त्याची सुरुवात केली होती. आज ते एका अत्यंत सफल मंडळात विकसित झाले आहे. २०२१ मध्ये, मंडळाने आपल्या स्थापनेची ५० वर्षे साजरी केली. २०२२ मध्ये, एक लघु अधिवेशन 'पीएमएम ५०' आयोजित करण्यात आले होते ज्यात बृ. म मं च्या अनेक स्वयंसेवकांनीही भाग घेतला होता.

मंडळाच्या परंपरेनुसार दर वर्षी पुढील कार्यक्रम सादर होतात: गणपती, दिवाळी, संक्रांत, पाडवा आणि सहल. याशिवाय, आमच्याकडे १० अतिशय अनोखे उपक्रम आहेत. दरवर्षी, आमच्या वार्षिक सहलीच्या दरम्यान, आम्ही पदवीदान समारंभ देखील आयोजित करतो ज्यामुळे सदस्यता वाढण्यास मदत होते. मंडळाचे देणगीदार उदार मनाने 'पीएमएम'च्या पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी मदत करतात. या वर्षी अरविंद आणि कविता पारखी यांनी $५००० दान केले, त्यात मंडळानेही तितकीच रक्कम घातल्याने सर्व मिळून रक्कम $१०,००० तयार झाली. हा निधी पुढचे काही वर्ष शिष्यवृत्तीसाठी वापरला जाईल. या वर्षी ३ विद्यार्थ्यांना प्रत्येकी $५०० ची शिष्यवृत्ती देण्यात आली.

**प्रश्न:** निधी संकलन आणि सामाजिक मदत - 'पीएमएम' विविध सामाजिक संस्थांना आर्थिक मदत करीत असते. तुमच्या निधी-संकलनाच्या प्रयत्नांबद्दल, विशेषतः गणेशोत्सवादरम्यान दिलेल्या उल्लेखनीय $ १०,००० देणगीबद्दल आम्हाला अधिक सांगू शकाल का?

**सुचित्रा ताई:** 'पीएमएम' हे उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मंडळ आहे जे फिलाडेल्फिया येथील भारतीय मंदिरासोबत दहा दिवसांचा 'फिलाडेल्फिया गणेशोत्सव' आयोजित करते. हा उपक्रम २००५ मध्ये श्री. मुकुंद कुटे (संयोजक, २००९ अधिवेशन) आणि 'भारतीय मंदिराचे सहसंस्थापक श्री. नंद तोडी यांच्या प्रयत्नांनी सुरू करण्यात आला. दरवर्षी, दहा दिवसांच्या या उत्सवासाठी करण्यात येणाऱ्या महाप्रसादाचे मोफत वाटप केले जाते. या दहा दिवसात जवळ जवळ १०००० भक्त जमा होतात. प्रत्येक दिवशी वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जातात. या वर्षी श्रीमती सोनिया परचुरे यांनी दिग्दर्शित केलेल्या "राम रतन धन पायो" या कथ्थक शैलीतील भव्य नृत्याविष्काराच्या सादरीकरणाने महोत्सवाचा समारोप झाला. महाराष्ट्रीयन तसेच या भागातील इतर भारतीय या उत्सवाची उत्सुकतेने वाट पाहतात आणि त्यात सहभागी होतात. दरवर्षी 'पीएमएम' 'Support a child' या उपक्रमांतर्गत आर्थिक देणगी मिळविण्याचा प्रयत्न करते. जमा झालेल्या निधीचा विनियोग विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या किंवा देणगीच्या स्वरूपात केला जातो. या वर्षी जमा झालेल्या देणगीपैकी $८५०० 'सेव्ह अ चाइल्ड' आणि $१५०० 'हिंदू

युवा चॅप्टर' या संस्थांना देण्यात आले. ही देणगी ३ विद्यापीठांतील ३ मुलांना दिली गेली. गेल्या वर्षीच्या उपक्रमांतर्गत स्थानिक विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांना 'फराळ बॉक्स'चे वाटप केले गेले.

**प्रश्न:** सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकरी कुटुंबांना पीएमएम समितीने दिलेल्या मदतीचीही आम्हाला जाणीव आहे. तुम्ही यासाठी देणग्या कशा गोळा केल्या? तुम्हा सर्वांना कशामुळे प्रेरणा मिळाली? हा विचार कसा पुढे आला?

**सुचित्रा ताई:** बृहन्महाराष्ट्र मंडळाने सोलापूर येथील पूरग्रस्त शेतकरी बांधवांसाठी मदतनिधी उभा करण्याचा संकल्प केला आणि उत्तर अमेरिकेतील सर्व महाराष्ट्र मंडळांकडे सहाय्यता मागितली. तेव्हा 'पीएमएम'ने असा विचार केला की जवळ जवळ २६० सभासद कुटुंबे जर किमान १५ डॉलर्स प्रत्येकी जमा करू शकली तर आपल्यालाही या सहाय्यता अभियानात सहभाग घेता येईल. जेव्हा मंडळाकडून हमी मिळते की निधी योग्य ठिकाणी वापरला जाणार आहे तेंव्हा सभासद देणगी देण्यास आनंदाने तयार होतात. अशा प्रकारे आम्ही सुमारे १५०० डॉलर्सचा निधी जमा केला.

सुचित्राताई शाळा समुदायातील मुलांनाही या ना त्या रूपाने देणग्या देण्याबद्दल आत्तापासूनच प्रोत्साहित करतात. त्या त्यांच्या सहकाऱ्यांचे देखील आभार मानतात आणि त्यांनी केलेल्या कामाचे कौतुक करतात.

**प्रश्न:** 'EcoSystem' उपक्रम - 'Ecosystem' हा शब्द बहुतेकदा एकमेकांशी संबंधित घटकांच्या नेटवर्कचा संदर्भ देतो, जे एकत्र काम करतात. तुम्ही तुमच्या दहा उपक्रमांचे वर्णन "Ecosystem"चा भाग म्हणून केले आहे. हे उपक्रम एकमेकांना कसे पूरक आहेत आणि तुम्ही हा शब्द का निवडला हे थोडे सविस्तरपणे सांगू शकाल का? यातील कुठले उपक्रम तुम्हाला समाजासाठी विशेष महत्वाचे किंवा प्रभावशाली वाटतात ?

**सुचित्रा ताई:** २०२२ मध्ये, कोविडची साथ नुकतीच संपली होती आणि मंडळाची सदस्यसंख्या खूपच कमी होती. कोविडच्या दरम्यान ऑनलाइन कार्यक्रमांची संख्या भरपूर असल्याने, लोकांना कोणत्याही कार्यक्रमात प्रत्यक्ष येण्याची गरज भासत नव्हती. दरवर्षी होणाऱ्या पाच पारंपारिक कार्यक्रमांच्या (गणपती, दिवाळी, संक्रांत, पाडवा आणि सहल) व्यतिरिक्त काही करण्याची गरज आम्हाला जाणवली. मंडळाची सदस्यसंख्या वाढवण्याच्या एकमेव ध्येयाने मी मराठी समुदायाला आवाहन पत्र लिहिण्यास मदत केली. मंडळाला ब्रँडिंगसह एक मिशन आवश्यक होते. त्यातून पीएमएम कनेक्ट ह्या उपक्रमाचा जन्म झाला. हा उपक्रम मराठी आणि अमराठी दोन्ही समुदायांसाठी खुला होता. या उपक्रमांतर्गत, आम्ही १ मे २०२३ रोजी 'बीएमएम'सोबत ५ किमी. चा 'वॉक' आयोजित केला. या वॉकमध्ये, आम्ही सहभागींना मंडळात सामील होण्याचे आणि अधिक उपक्रम आणण्याचे आवाहन केले. आम्ही त्यांना आश्वासन दिले की मंडळ त्यांना मदत करण्यास तयार आहे. त्यात बरीच उत्सुकता होती आणि हळूहळू लोक त्यांच्या कल्पना घेऊन पुढे येत गेले. आम्ही त्या प्रत्येक उपक्रमाचे 'इनिशिएटिव्ह लीड्स' तयार केले आणि त्यांना ते ते उपक्रम अधिक विकसित करण्याची संधी दिली. 'पीएमएम'च्या छत्राखाली असलेल्या प्रत्येक उपक्रमाला स्थिर रचना देण्यासाठी आम्ही काही मूलभूत मार्गदर्शक तत्त्वे स्थापित केली आहेत. आज आमच्याकडे १० उपक्रम आहेत जे तरुणांना तसेच ज्येष्ठांनाही फायदेशीर आहेत. प्रत्येक वयोगटासाठी एक उपक्रम आहे, जो समान वय, आवडी-निवडी आणि छंद असलेल्या लोकांना एकत्र आणतो. उदाहरणार्थ 'पीएमएम कनेक्ट', 'पीएमएम क्रिकेट क्लब', 'पीएमएम हेन्सी', 'पीएमएम मूव्ही क्लब', 'पीएमएम स्पार्क', 'पीएमएम यारी', 'पीएमएम मराठी शाळा', 'पीएमएम क्लासिक्स', 'पीएमएम रायझर्स' आणि 'पीएमएम वारसा' इ. प्रत्येक उपक्रम स्वायत्तपणे चालतो, प्रत्येक उपक्रमातील कार्यक्रमांचे तिकीट असते, जे उपक्रम टिकवून ठेवण्यास मदत करते. आमच्या प्रत्येक अनोख्या उपक्रमाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी, कृपया आमच्या वेबसाइटला भेट द्यावी : https://www.phillymm.org/pmm-initiatives

**प्रश्न:** भविष्यातील योजना - तुमच्या Ecosystem चा भाग असलेल्या उपक्रमांव्यतिरिक्त काही आगामी उपक्रम आहेत का जे तुम्ही अधोरेखित करू इच्छिता?

**सुचित्रा ताई:** 'पीएमएम'च्या प्रत्येक उपक्रमाचे ध्येय म्हणजे मराठी माणसांना एकत्र आणण्याची साखळी बनवणे, शक्य तितके सर्वांना समाविष्ट करून घेणे आणि सामुदायिक सेवेद्वारे समाजाचे ऋण फेडणे. हे लक्षात घेऊन 'शिवजयंती', 'सेवा दिवाळी' असे अनेक आगामी सांस्कृतिक आणि सामाजिक प्रकल्प आम्ही आयोजित करणार आहोत. त्याचप्रमाणे 'पीएमएम' शाळेद्वारे, आम्ही 'Canned Goods संग्रह' मोहीमेची योजना आखत आहोत. 'ड्रॉपबॉक्सद्वारे 'कॅन्ड फूड' गोळा करा आणि बेघरांना दान करा' असा तो उपक्रम आहे.

**प्रश्न:** हे उपक्रम दीर्घ काळ सातत्याने आणि यशस्वीरीत्या चालू ठेवण्यासाठी कोणते उपाय केले जात आहेत?

**सुचित्रा ताई:** प्रत्येक उपक्रमासाठी आम्ही योग्य मार्गदर्शक तत्त्वे तसेच प्रमुख व्यवस्थापक सुनिश्चित केले आहेत. 'पीएमएम' प्रत्येक उपक्रमाची पूर्ण जबाबदारी व्यवस्थापकांना देते आणि कोणत्याही सूक्ष्म व्यवस्थापनापासून (micro management) दूर राहते. आम्ही सुरुवातीला काही आर्थिक मदत देऊन उपक्रम सुरू करतो आणि त्यानंतर प्रत्येक उपक्रमाची आर्थिक जबाबदारी ही त्या त्या व्यवस्थापकांची स्वतःची असते.

'पीएमएम'च्या इतर उपक्रमांपैकी एक म्हणजे 'पीएमएम स्पार्क' (सपोर्ट, प्रमोट, ॲक्सिलरेट, सपोर्ट ॲंड किंडल) समिती दर तिमाहीत कॉलेज ॲप्लिकेशन्सपासून, नवीन स्थलांतरितांना स्थायिक होण्यास मदत करणे, ते 'प्रोफेशनल नेटवर्किंग' इत्यादी विविध विषयांवर वेबिनार आयोजित करते.

**प्रश्न:** सहकार्य आणि प्रेरणा - तुम्हाला हे मॉडेल इतर मंडळांसाठी प्रेरणास्थान होऊ शकते असे वाटते का? त्यांना तुम्ही काय सल्ला द्याल?

**सुचित्रा ताई:**आमच्यासारखे मॉडेल हवे असणाऱ्या कोणत्याही मंडळाला आम्ही लहान प्रमाणात सुरुवात करण्याची शिफारस करतो. ठराविक संख्येने कार्यक्रम आयोजित करण्याचे लक्ष्य ठेवा आणि उपक्रमाला मूळ धरण्यासाठी वेळ द्या.

**प्रश्न:** दिवाळी अंक - तुमच्या दिवाळी अंकाबद्दल काही सांगाल का?

**सुचित्रा ताई:** 'पीएमएम'ने अलीकडेच २०२५ मध्ये त्यांचा पहिला वहिला दिवाळी अंक प्रकाशित केला — एक प्रभावी ६०-पृष्ठांची आवृत्ती - फक्त ऑनलाइन अंक नसून छापलाही गेला. अंकाच्या यशाचे श्रेय मी आमच्या 'पीएमएम प्रॉन' टीमला देते. शिल्पा नागले आणि निनाद मंत्री यांचे ही कल्पना साकारल्याबद्दल आणि लेखनाबद्दल तसेच गिरीश पटवर्धन यांचे प्रकाशन व्यवस्था सांभाळल्याबद्दल मन:पूर्वक आभार.

**प्रश्न:** 'बृ. म मं' बद्दल किंवा तुमच्या 'EcoSystem' चा भाग असलेल्या 'शाळा' आणि 'बीकनेक्ट' सारख्या उपक्रमांचा अवलंब करण्याबद्दल काही अनुभव?

**सुचित्रा ताई:** आम्हाला 'पीएमएम' शाळा सुरु करण्यासाठी बृ. म मं चे अध्यक्ष श्री. प्रसाद पानवळकर आणि शाळाप्रमुख राहुल देशमुख यांचे खूप मोलाचे मार्गदर्शन मिळाले. आमच्या शाळेचे मुख्याध्यापक आणि प्रशासक यांनाही या दोघांची खूप मदत झाली. बृ. म मं च्या शाळेचे 'SOP document' खूप उपयोगी आहे. त्याचा शाळेची उभारणी करण्यासाठी खूप फायदा झाला. याबरोबरच, 'पीएमएम कनेक्ट' विकसित करण्यामागे 'बीकनेक्ट'ने दिलेली प्रेरणा आमच्यासाठी महत्त्वाची ठरली.

वृत्त: सुचित्रा ताई तुम्ही आम्हाला दिलेल्या वेळेबद्दल आणि 'PMM' तर्फे तुम्ही करत असलेल्या कार्याबद्दल पुन्हा एकदा खूप खूप धन्यवाद!

**कोमल कुलकर्णी आणि अपर्णा कोळेकर,**
सदस्य, संपादक समिती,
बृ. म. मं वृत्त

## वाचकांचे विचार

नमस्कार,

दिवाळी अंक मिळाला. खूप खूप धन्यवाद

**डॉ. जिज्ञासा परांजपे दुडगीकर**
हरिपूर मोफत वाचनालय, मिरज

महोदय,

आपण आमच्या संस्थेला बृहन्महाष्ट्र वृत्त हा दिवाळी अंक भेट म्हणून दिल्याबद्दल संस्था आपली अत्यंत आभारी आहे. आपली ठेव सुरक्षित राहील यांची आम्ही दखल घेऊ, त्याचवेळी वाचकांना ती काळजीपूर्वक उपलब्ध करुन देऊ . आपले संस्थेवर प्रेम आहेच, ते तसेच राहो, धन्यवाद !

**कार्यवाह, मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे**

सप्रेम नमस्कार,

सर्वप्रथम, आपल्या वृत्ताच्या दिवाळी अंकाची छापील प्रत आपण आठवणीने **पुणे मराठी ग्रंथालया**कडे पाठवलीत यासाठी आपणांस मनःपूर्वक धन्यवाद. या निमित्ताने आपण उत्तर अमेरिकेतील ६० पेक्षा अधिक महाराष्ट्र मंडळांशी संलग्न राहून मराठीचा जागर परदेशात जागता ठेवत आहात याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन.

मराठीच्या प्रसारासाठी आपणांस कोणत्याही गोष्टींची/उपक्रमांची आवश्यकता वाटल्यास आपण आम्हांस संकोच न करता कळवावे आम्ही याबाबत अधिकाधिक प्रयत्नशील राहू !

या निमित्ताने साधलेले स्नेहबंध उत्तरोत्तर अधिक राहण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू या !

**आपला विश्वासू,**
**(सुधीर इनामदार) कार्यवाह**





🏆 **BMM कॅरम स्पर्धा 2025–2026**

पुरुष व महिला – सर्व वयोगट (Singles & Doubles)

उद्दिष्ट: मराठी समुदायाला अधिक जवळ आणणे

हिवाळ्याच्या थंडगार दिवसांत घरात खेळ-मनोरंजनाची मजा काही औरच!

यंदा BMM आपल्या समुदायाला एकत्र आणण्यासाठी घेऊन येत आहे BMM कॅरम स्पर्धा 2025–2026!

अनुभवी खेळाडू असाल किंवा अगदी नवीन — कॅरम हा सर्वांना आवडणारा, सोपा आणि मजेदार खेळ.

गरम चहा, गप्पा आणि स्ट्रायकरच्या साथीत घालवलेला वेळ — मित्रमंडळी आणि मराठी समुदायासोबत जोडला जाण्यासाठी उत्तम संधी!

🎯 प्रस्तावित स्वरू

Singles

Doubles

Mixed Doubles / Lucky Doubles

🏅 प्रस्तावित स्पर्धा स्तर

१. मंडळ पातळीवरील स्पर्धा

प्रत्येक मंडळ आपल्या सदस्यांसाठी स्वतंत्र स्पर्धा आयोजित करेल.

२. प्रादेशिक स्पर्धा

शेजारील मंडळांतून विजेते/उपविजेते एकत्र येऊन स्पर्धा.

३. राष्ट्रीय स्पर्धा

TBD – लवकरच माहिती जाहीर करण्यात येईल

📍 प्रस्तावित स्थळ

कम्युनिटी हॉल

घरगुती / बेसमेंट सेटअप

📅 प्रस्तावित वेळ

हिवाळ्यातील कोणताही शनिवार–रविवार

📞 संपर्क

तुषार वेदांती – 484-354-6951

गौरव पाटवर्धन – 573-202-3626


AVANA
SENIOR CARE
Pune, India
PEACE OF MIND FOR YOU & YOUR LOVED ONES
Professional senior care with a personal touch.
Co-Founded by Ms Niharika
MHA- Mount Sinai Hospital, NY
Senior Living Mgt - Cornell University, NY
SERVICES WE OFFER
Independent Living
Assisted Living
Day Care
Wellness & Rehabilitation
Medical Support & Emergency Management
Pet Therapy & Companionship
TRY BEFORE YOU DECIDE
BOOK A TRIAL STAY TODAY!
+91 9090070782
avanaseniorcare.com

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



**Artist: Amita Rajadhyaksha**
Dimensions:40″x60″
Medium: Acrylic
Price:Not for Sale
Mandal: MMLA



***Kyoto - Kinkakujicho***
**Artist: Pratima Lele**
Dimensions:9″x12″
Medium: Watercolor
Price:$750
Mandal: Marathi Vishwa NJ



***Resting Buddha***
**Artist: Prerana Kulkarni**
Dimensions:12″x16″
Medium: Watercolor on wood panel
Price:$625
Mandal: MMLA



***Anika***
**Artist: Vinita Mohite**
Dimensions:11″ x 14″
Medium: Oil on canvas
Price:Not for Sale
Mandal: Seattle Maharashtra Mandal



***Soulful Surrender***
**Artist: Bharti Gorkar**
Dimensions:36″x24″
Medium: oil
Price:$2500
Mandal: Seattle MM



***Mandirachi Sandhya***
**Artist: Supriya**
Dimensions: 40″ x 40″
Medium: oil on gallery wrap canvas
Price: $799.
Mandal:

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.